साप्ताहिक
# माणूस

शनिवार
१३ जुलै १९७४

मूल्य
एक रुपया

जयप्रकाशांनी सुरू केलेल्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाला साथ देण्यासाठी अनेक व्यक्ती, संस्था, संघटना, पक्ष पुढे येत आहेत. या आंदोलनामुळे भ्रष्टाचार नष्ट होईल, अशी ग्वाही जरी कुणी देऊ शकत नसतील, तरी भ्रष्टाचार हा एक शिष्टाचार होण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात रोखली जाईल, देशभर भ्रष्टाचारविरोधी एक वातावरण तयार होईल, याविषयी दुमत होण्याचे कारण नाही. आपल्याकडील परिस्थितीला साजेसा हा एक लोकशाही शुद्धीकरणाचा प्रयोग आहे असेही म्हणता येईल. यादृष्टीने या आंदोलनाला महाराष्ट्रातूनही साथसंगत लाभावी, पाठिंबा मिळावा असे आम्हाला वाटते. आत्तापर्यंत दोन-तीन सभांतून असा पाठिंबा व्यक्तही झालेला आहे. पुढचे पाऊल म्हणून आता एक युवक-नागरिक स्त्री-पुरुषांचा मोर्चा व त्याला जोडून चोवीस तासांचे एक लाक्षणिक उपोषण असा कार्यक्रम आम्ही लोकांसमोर ठेवीत आहोत. तूर्त १ ऑगस्ट १९७४ हा दिवस ठरलेला आहे. सर्वांनी हा कार्यक्रम उचलून धरावा व सद्यस्थितीविषयीचा आपला असंतोष परिणामकारक पण संयमपूर्णरीत्या व्यक्त करावा अशी विनंती आहे, असे आवाहन आहे.



आपले,

- प्रभाकर पाध्ये
- सौ. कमल पाध्ये, संपादक, बियाँड फ्रेंडशिप
- गोविंदराव शिंदे, ग्रामदान मंडळ
- जयवंत मटकर, सर्वोदय मंडळ
- श्री. ग. माजगावकर, संपादक माणूस साप्ताहिक
- सय्यदभाई, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, पुणे
- बिंदूमाधव जोशी, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, पुणे
- यदुनाथ थत्ते, संपादक, साधना साप्ताहिक
- नाना डेंगळे, राष्ट्र सेवा दल सैनिक
- डॉ. वि. भा. देशपांडे, पुणे
- द. मा. मिरासदार
- चं. प. भिशीकर, संपादक, तरुण भारत, पुणे

---

मी बडोद्याला असल्याने येऊ शकत नाही. तरीही आपली कल्पना मला संपूर्णपणे मान्य असल्यामुळे मी **बडोद्यासच** एक दिवसाचे उपोषण करायचे ठरविले आहे.

–दादूमिया
(८ जुलै ७४)


आत्ता पर्यंत
सतराशेसाठ
छत्र्या हरवल्या,
विसरल्या.
म्हणून 'छत्री'
हेअर स्टाईलच
करून घेतली!


हं आलं
माझं
ऑफीस!
पावसाचं कारण पुढे करून
पेट्रोल वाचवायचे हे
धंदे छान आहेत हो
बाई !



माझ्या वयाला एकसष्ठ वर्षे झाली।
अच्छाऽ अच्छा! आम्हाला वाटलें खुर्चीवर येऊन एकसष्ठ वर्षे झाली।
सावधान! शुभ मंगल चाललंय!!
श्यामजोशी

# साप्ताहिक माणूस


| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १३ जुलै | अंक : सातवा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


२९ जून १९७४

श्री. सपादक, साप्ताहिक माणूस, पुणे.

महाशय,

दिनांक २२ जून १९७४ च्या माणूसमध्ये 'न्या. हिदायतउल्ला, दर्डा आणि मुख्यमंत्र्याचे चिटणीस' या मथळचाखाली प्रसिद्ध झालेल्या मजकुराचे संदर्भात खालील खुलासा करीत आहे.

विधान परिषदेवर राज्यपालानी नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या सदस्यत्वाला कायदेशीर हरकत घेणारा अर्ज राज्यपालाचेकडे आला होता आणि राज्यपालानी त्यावर सरकारचे मत मागविले होते. या पत्राची मुख्यमंत्र्याना माहिती नसणे म्हणजे मुख्यमंत्र्याच्या कार्यालयात अनागोदी आहे असे विधान 'माहितगाराने' केले आहे. राज्यपालाचे पत्र मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयात आले नव्हते. ते सामान्य प्रशासन विभागाकडे गेले होते. मुख्यमंत्र्याच्या सचिवालयाकडे राज्यपालाचे पत्र आले नसल्याने ते पत्र मुख्यमंत्र्याना दाखविण्याचा प्रश्न उद्भवला नाही. म्हणूनच या प्रकाराला सामान्य प्रशासन विभागात जी व्यक्ती जबाबदार असेल तिचे विरुद्ध चौकशी करू असे मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सागितले होते. त्याप्रमाणे ही चौकशी चालू असून लौकरच ती पूर्ण होईल.

या प्रकरणी सल्ला घेण्यासाठी श्री. दर्डा मुख्यमंत्र्याचे खासगी चिटणीस श्री. नाशिककर यांचेबरोबर माजी सर न्यायाधीश श्री. हिदायतउल्ला याचेकडे गेले होते असेही विधान या लेखात आहे. हा उल्लेख धादात खोटा आहे. कारण श्री. नाशिककर या कामाकरिताच काय पण इतर कोणत्याही कामासाठी श्री. दर्डा याचेबरोबर किंवा एकटे श्री. हिदायतउल्ला यांचेकडे गेलेले नाहीत.

मुख्यमंत्र्यानी विधान परिषदेवर नामनिर्देशित करावयाच्या जागासाठी काही नावे राज्यपालांच्याकडे पाठविल्याचा व राज्यपालानी ती यादी अमान्य केल्याचाही उल्लेख या लेखात आहे. हे विधानसुद्धा पूर्णपणे चुकीचे आहे. कारण मुख्यमंत्र्यांनी अशी यादी राज्यपालाचेकडे अजून पाठविलेली नाही. त्याचप्रमाणे या प्रकरणी मुख्यमंत्र्यानी पंतप्रधानाना पत्र पाठविले असल्याचा उल्लेखही निराधार आहे.

'माहितगाराच्या' या लेखातील बरीचशी विधाने पूर्णपणे निराधार असून त्यामुळे वाचकाची निश्चितच दिशाभूल होईल. तरी कृपया या खुलाशास आपण यथायोग्य प्रसिद्धी द्यावी ही विनती.

आपला विश्वासू<br>
**वा. रा. सामंत**<br>
माहिती सचालक, महाराष्ट्र शासन

---

• मुखपृष्ठावर दिलेल्या कार्यक्रमासंबंधीचा आणखी तपशील माणूस अंकातून व इतर वृत्तपत्रातूनही प्रसिद्ध होत राहील. ज्या व्यक्तींना या कार्यक्रमात सहभागी व्हायचे आहे त्यांनी नाव, पत्ता, असल्यास काही सूचना इत्यादी तपशील लेखी स्वरूपात माणूसकडे ताबडतोब कळवावा. परगावच्या मंडळीनीही या कार्यक्रमात सहभागी होण्यास हरकत नाही.

---

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० । दूरध्वनी ५७३५९

# अंतर्गत फाटाफुटींनी पोखरलेलं मराठवाडा आंदोलन

## ॥ उत्तरार्ध ॥ सु. ल. सोमण ॥

मी औरंगाबादेत पोचलो तो दिवस बहुधा चांगला असावा. मराठवाड्यात छेडल्या गेलेल्या आंदोलनाच्या संदर्भात मी औरंगाबादेत आलो होतो आणि त्या संदर्भातच तो दिवस चांगला असावा असे मी म्हटले. कारण नगर ते औरंगाबादच्या प्रवासात मला औरंगाबादचे बँक कर्मचाऱ्यांचे एक नेते भेटले. तिथल्या इतर कामगार चळवळीतही भारतीय मजदूर संघाच्या वतीने त्यांचा सहभाग असतो. औरंगाबादचेच निवासी, त्यातून सामाजिक, कामगार चळवळीमध्ये रस असलेले, सक्रीय सहभागी होणारे. अर्थात ताज्या आंदोलनाबद्दल ते बरेच काही बोलू शकले. ह्या आंदोलनात, त्यांनी स्वत देखील काही प्रमाणात भाग घेतलेला होता. त्यामुळे साहाजिकच, खुद्द औरंगाबादेत पोचण्यापूर्वी, प्रवासातच, आमच्या औरंगाबादविषयी गप्पा मात्र सुरू झाल्या. अडीच तीन तासपर्यंत त्या रंगल्याही झकास. कुठलेही जनआंदोलन म्हटले की, कामगार हा त्याचा अविभाज्य भाग असतो, असे निदान परवा परवापर्यंत तरी वाटत होते. गुजराथच्या भल्या मोठ्या आंदोलनाने हा पायंडा मोडला. संपूर्ण गुजराथ ढवळून काढून तिथले शासन कोलमडायला लावणाऱ्या त्या अभूतपूर्व आंदोलनापासून, कामगार प्राय अलिप्तच राहिला. इतकेच नाही, तर अहमदाबाद-बडोद्याच्या रस्त्यातून प्रत्यक्ष तुफान रणधुमाळी चालू असतानाही हा कामगार, बाजूलाच आपापल्या कारखान्यातून काम करीत राहिला.

मराठवाड्यातही काही फारसे वेगळे घडले असे मला वाटत नाही. वरील गप्पामध्ये व नंतरही मराठवाडाभर चर्चा करताना, मला हेच जाणवले की, कामगार फारसा ह्या आंदोलनाच्या जवळपास फिरकला नाही. रूढार्थाने कामगार तसा मराठवाड्यात कमीच आहे. तोही फारसा संघटीत वाटत नाही. शहरी कामगारांनी दोन-चार दिवस कुठे कुठे थोडी साथ आंदोलनाला दिली. पण आंदोलन दिशाहीन पद्धतीने रेंगाळत जाते आहे असे दिसताच, त्यांनी आंदोलनाकडे चक्क पाठ फिरवली. मराठवाड्यात, असंघटित कामगार व शेतमजूर फार मोठ्या प्रमाणावर. त्यांना ह्या आंदोलनात सहभागी करून घ्यायचा फारसा प्रयत्न आंबाजोगाई तालुका वगळता कुठे झाला असे मला तरी वाटत नाही. हा वर्ग नुसताच असंघटित नाही, तर त्याचबरोबर फार मोठ्या दडपणाखालीही वावरत असतो. जिथे तो रावतो त्या ठिकाणच्या 'बड्यां'च्या (हे 'बडे' म्हणजे एका परीने जुन्या जमान्यातले जमीनदारच! आता खादीधारी बनल्यावर तर ह्यांचा रुबाब जास्तच वाढलेला!!) वर्चस्वाखाली. बडखोरांची किंवा क्रांतीवाद्यांची काही मते त्याला पटली तरी, हे वर्चस्व झुगारून द्यायची त्यांना हिंमत होत नाही.

शेतमजूर व असंघटित कामगार आंदोलनापासून दूर राहिला त्याचे आणखीही एक कारण शोधता येईल. ह्या वर्गाशी संपर्क साधून, त्यांच्यामागे आपली शक्ती उभी करून व त्यांचे काही प्रश्न उचलून धरून, त्यांना आंदोलनात सहभागी करून घ्यायचे प्रयत्नच फारसे झाले नाहीत. असे प्रामाणिक प्रयत्न झाले असते तर काही अंशी तरी हा वर्ग आंदोलनात उतरला असता आणि आंदोलनाला व्यापक लढ्याचे स्वरूप प्राप्त झाले असते. मराठवाड्यातल्या ८२ महाविद्यालयातून किमान अर्ध्या लाखाच्या वर विद्यार्थी आहेत त्यापैकी बहुसंख्य विद्यार्थी (६५ ते ७०%) ग्रामीण भागातून आलेले आहेत. शेतकरी आणि शेतमजूर ह्यांच्याशी ह्या विद्यार्थ्यांचे रक्ताचे नाते आहे. विद्यार्थी व ग्रामीण भागातला असंघटित शेतमजूर त्यामुळे एकमेकांना फार चांगले समजून घेऊ शकतो. आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळातच जर, ग्रामीण विद्यार्थ्यांकरवी, खेड्यापाड्यातून कृतिसमित्यांचे जाळे विणले गेले असते आणि त्या द्वारे विद्यार्थ्यांच्या संघशक्तीचा फायदा असंघटित शेतमजुरांची संघशक्ती तयार करण्यासाठी वापरला गेला असता, तर आंदोलन खऱ्या अर्थाने सर्वंकष झाले असते. पण तसे फारसे प्रयत्नच झाले नाहीत. किंबहुना तो विचारही कुणी फारसा केला नाही. परभणीच्या कृषिविद्यापीठातल्या शेतमजुरांचे प्रश्न घेऊन तिथल्या मागण्या धसास लावण्यासाठी एक लढा स्थानिक 'युक्राद'ने उभारला आहे. लातूरला काही विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना ह्या प्रश्नावरची त्यांची मते स्वागतार्ह वाटली. आंबेजोगाईला डॉ. लोहिया व सौ. लोहिया ह्यांच्या मार्गदर्शनाखाली तिथली युवाशक्ती प्रत्यक्ष अशा कार्यासाठी जुटलेली देखील आहे. बीडमध्ये तर प्रत्यक्ष शेतमजुरांचे मोठाले मेळावेही यशस्वी झाले आहेत. तेव्हा प्रश्न होता तो फक्त काही ठिकाणी आधीच तयार झालेल्या ह्या शक्तीचा विद्यार्थी-शक्तीशी समन्वय साधायचा व अन्य ठिकाणी विद्यार्थी-युवाशक्तीचा कणा देऊन शेतमजुरांची ताकद उभी करण्याचा! आणि विद्यार्थ्यांना हे अशक्य होते असे वाटत नाही. पण ते झाले नाही. तेवढा विचारच मुळी झाला नाही. आता मात्र असा विचार चालू आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. नांदेडला भरलेल्या विद्यार्थी कृतिसमितीच्या बैठकीत, परीक्षानंतरच्या सुट्याच्या काळात, ग्रामीण विभागातून शेतकऱ्यांच्या सहकार्यातून कार्य उभारायचा संकल्प केला गेला. त्यांच्या खतांच्या व बियाणांच्या वाटपाच्या बाबतीत गोंधळ उडतो, अनेक गैरप्रकार

चालू असतात. त्यांना वाचा फोडायचा, अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा हे ते प्रयत्न आहेत.

जी उदासीनता शेतमजुराविषयी ह्या आदोलनात दिसली, तीच रेल्वे कर्मचाऱ्याविषयीच्या भूमिकेची. हे आदोलन छेडले जात असतानाच, रेल्वेचा सार्वत्रिक सपही झाला. त्याचा फारसा परिणाम मराठवाड्यावर झालाच नाही. एक तर आधी, मराठवाड्यात रेल्वे कमीच. तीवर धावणाऱ्या तुटपुज्या गाड्यांपैकी निम्म्या गाड्या सपापूर्वीच रेल्वेने रद्द केलेल्या. त्यामुळे ह्या भागात सप १००% होता तरीही त्यामुळे काही फारसा फरक पडला नसताच. असे असले तरी पूर्णा स्टेशनवर रेल्वेचा स्टाफ बराच आहे व तो मोठ्या प्रमाणावर सपावर होताही. इथल्या एका सपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्याला मनापासून असे वाटते की, '...विद्यार्थी जर आमचेही आदोलन उचलून धरते, तर रेल्वेचा सप मराठवाडाभर पसरता व हे इथे सुरू झालेले लोण इतरत्रही पसरून विद्यार्थी-तरुण व रेल्वे कामगार ह्याचे सयुक्त आदोलन उभे राहू शकले असते. इथल्या विद्यार्थ्यांना तशी फार मोठी सधी होती. त्याचे आंदोलन सुरू होतेच. त्यालाच रेल्वेचा प्रश्नही जोडून देता आला असता. पण अगदी खरे सागायचे तर असा प्रयत्नच फारसा झाला नाही. आम्ही एक-दोनदा अॅप्रोच झालोही, पण प्रतिसाद मिळाला नाही...खरे तर आणखीही एक झालर लावून विद्यार्थ्यांना हे आपले आदोलन म्हणूनही राबवता आले असते. मनमाड-मुदखेडपर्यंतचा भाग मध्य रेल्वेत घालावा अशी आमची एक मागणी आहे. दक्षिण मध्य रेल्वेत असल्याने इथे रेल्वेमधून सगळीकडे दाक्षिणात्याचाच भरणा आहे. मराठवाडाकर नावालाही नाही. हाही मुद्दा विद्यार्थी आदोलकाना उचलून धरता आला असता. आम्ही सूचनाही केली होती. पण रिस्पॉन्स शून्यच !'

## सामान्य लोकांचा सहभाग

एकूण काय श्रमजीवी वर्ग तसा ह्या मराठवाड्याच्या आदोलनाकडे वळलाच नाही. कामगार तुटपुजा वर्ग. पण तो बराचसा अलिप्त राहिला. शेतमजुराला सादच घातली गेली नाही. रेल्वे कर्मचाऱ्याच्या सादीला दाद दिली गेली नाही. मग प्रश्न असा पडतो की हे आदोलन काही अशी तरी जनआंदोलन झाले असे म्हटले जाते म्हणजे काय ? औरगाबाद, नादेड, परभणी, जालना वगैरे शहरातून काही नागरिक ह्या आदोलनात उतरले. जनता विकास परिषदेने सक्रीय भाग घेतला, तर कॉंग्रेस, शेकाप, समाजवादी, कम्युनिस्ट, जनसघ आदी मडळी ह्या आदोलनात सहभागी झाली. '.. पण तशी ही मडळी नेहमीच असतात. नेहमी ५-१० असतात, तर ह्यावेळी ५०-६० असतील एवढेच.' एस. टी. औरगाबादेत प्रवेश करू लागली तेव्हा आमचे सह प्रवासी भारतीय मजदूर सघवाले म्हणाले, '...एवढ्यासाठीच जर ह्या लढ्याला जनआदोलन म्हणायचे असेल तर म्हणा तुम्ही, पण हा असा मर्यादित पाठिंबा व तोही शहरी भागातूनच, ह्या पलिकडे हे आदोलन गेले नाही ही वस्तुस्थिती आहे. सर्वसामान्य जनता आदोलनापासून दूरच राहिली. अगदी गुजराथ पद्धतीने एसआरपीना थोपवून धरण्यासाठी बॅरीकेडस वगैरे उभारली गेली हे जरी खरे असले तरी त्यात देखील सामान्य लोकांचा सहभाग नव्हता हे इथे लक्षात घेतले पाहिजे. राजकीय पक्ष पुढे आले, पण केवळ क्रेडीट घेण्यासाठी. आदोलनाच्या निमित्ताने, विद्यार्थ्यांना पुढे करून ह्या पक्षांनी स्वत.चे राजकारण केले एवढेच. एकूण आंदोलनात सिंहाचा वाटा होता तो विद्यार्थ्यांचाच. पण तेही विद्यार्थी एकसध नव्हते. मुसा, कॉंग्रेस, युक्राद, अभाविप, समाजवादी, कम्युनिस्ट अशा अनेक छटा होत्या. समन्वय समिती किंवा कृतीसमिती प्रस्थापून एकसध फळी उभारायचे प्रयत्न झाले. पण राजकारणामुळे तेही फोल ठरले... त्यातच, १२-१५ हजारांचा दलित विद्यार्थ्यांचा गट आंदोलनापासून फटकून राहिल्यामुळे व काही अशी उस्मानाबाद जिल्हाही (उदगीरचा अपवाद वगळता !) अलिप्त राहिल्याने, विद्यार्थ्यांची भक्कम फळी उभीच राहू शकली नाही...औरंगाबादच्या गोळीबारात, चार नाहक बळी पडल्यावर! तर ही फळी जास्तच हादरली.... ह्याच्या भरीला भर म्हणजे जिल्ह्या जिल्ह्याचे राजकारण. मराठवाडातर्गत जिल्हा पातळीवरची सुदोपसुदी. प्रत्येक जिल्ह्याचा पुढारी आपापल्या दिशेने आदोलनाला खेचायचा प्रयत्न करीत होता. मराठवाड्यात देखील, औरगाबादचा जो विकास झाला आहे त्या मानाने बाकीचे जिल्हे खूपच मागासलेले आहेत. त्यामुळे आंदोलनाला पुढे पुढे औरगाबाद विरुद्ध उर्वरित मराठवाडा असेही स्वरूप काहीसे मिळाले आणि इतर सर्व पिसे गळून जाऊन आदोलन निष्प्रभ झाले...

...मुबईला काय घडले त्यावर मोठे रामायण लिहिता येईल. अनेक आरोप-प्रत्यारोप झाले. पण त्यातून एक मात्र निश्चित झाले. भाई श्रॉफ, भालेराव व काही अशी खुद्द विजय गव्हाणे, आदिवरील विद्यार्थ्यांच्या विश्वासाला बराच तडा गेला. ह्या मडळीना ३१ मेच्या मेळाव्यात अक्षरशः हूटआऊट केले विद्यार्थ्यांनी ! ही गेलेली पत थोडीफार परत मिळवावी, एवढाच भाई श्रॉफ ह्यांच्या उपोषणाच्या 'स्टट'चा उद्देश...'

आमची बस औरगाबादेत शिरता शिरता, इतका वेळपर्यंत शांतपणे चर्चा ऐकत बसलेला कडक्टर म्हणाला, '...अरे भाईसाब, पूरा बकवास था सब. मनाला येईल तसे सगळे उधळत होते. कुणाचा पायपोस कुणाला नाही...अरे साहेब, लढाई करणे एवढे सोपे नाही. ×××× चे तर ते कामच नाही...'

औरगाबादेत एस. टी. रात्री ९॥-१० ला पोचली. आणि एकूण नशीब चांगले म्हणा, पण लॉजवर सहप्रवासी भेटला तोही चांगलाच बोलणारा मिळाला. औषधी विक्रेता म्हणून अनेकवेळा सपूर्ण मराठवाडा पालथा घातलेला. आदोलन काळात, मराठवाड्यात प्रत्यक्ष हजर असलेला. अनेक विद्यार्थी नेत्याशी जवळचे सबध असलेला. त्याने एकूण आंदोलन काळातल्या बऱ्याच गमतीजमती सागितल्या. त्यातल्या काही इथे त्याच्याच शब्दात ऐकवण्याजोग्या आहेत. '...अरे साहेबा, कसल्या लब्या चवड्या गप्पा मारून बसला आहात तुम्ही ब्रॉड बेस्ड मास एजिटेशन वगैरेच्या. ह्या साऱ्या थापा आहेत. करप्शन, माल प्रॅक्टीसेस वगैरेच्या विरुद्धची पावले हेही स्टटस होते. काही तुरळक उदाहरणे असतील प्रामाणिक एजिटेशनची. पण बाकी सगळी भकस होती.... भ्रष्टाचाराविरुद्ध हात उगारताना स्वत.ची नैतिक पातळीही तितकीच उच असावी लागते. इथे सगळाच उल्हास ! नावे देत नाही, पण मी स्वत.च्या डोळ्यांनी

बघितलेय. कारण मला आजही त्यांच्याशी सबध ठेवायचे आहेत. माझा स्वार्थ आहे; पण त्याला नाईलाज आहे !...पकडलेल्या विद्यार्थी नेत्याकडे नोटांची पुडकीच्या पुडकी सापडली ही वस्तुस्थिती आहे. कुठून आला हा पैसा ? ठिकठिकाणच्या कृतीसमित्यानी फड गोळा केला. ह्याचा हिशेब अजूनही कुणी दिलेला नाही. देता येण्याजोगी परिस्थितीच नाही. तुम्हाला खोटे वाटेल मिस्टर, पण ह्या विद्यार्थी नेत्याच्या रात्री ज्या बैठकी झडायच्या त्या बैठकीच्या वेळी बियरच्या (व इतरही लिकरच्या !) बाटल्यावर बाटल्या फुटायच्या आणि डझनानी ब्रिस्टॉल-बर्कले-विल्सची पाकिटे रिकामी व्हायची ! विद्यार्थी दशेत अशा तऱ्हेने उधळला जाणारा पैसा 'सरळमार्गानेच' केवळ विद्यार्थ्यांच्या खिशात येत होता, हे निदान मी तरी मानणार नाही...आणखी एक किस्सा साहेब. विद्यार्थी कृतीसमितीच्या एकेका केंद्रावरची टेलिफोनची बिले किती यावीत ? पाच पाच हजार फक्त ! कुठल्या तोडाने, कुठल्या मश्याला तुम्ही त्याच्या घरातल्या टेलिफोन बिलासबधी खुलासा मागू शकाल...'

गप्पाच्या ओघात औषध विक्रेते श्री. गभीर खूपच रगात आले होते. नाशिक, अहमदनगर आणि मराठवाड्याचे चार जिल्हे त्याच्याकडे. त्यापूर्वी विदर्भात दिवस काढलेला. त्यामुळे अनेक ओळखीपाळखी. खूप गमतीजमतीची माहितीची पोतडी. त्याच रगात श्री. गभीर पुढे सागू लागले, '.. अर्थात, जसा वारसा मिळतो, तसेच पुढचे नेतृत्व प्राय. मिळते. मुसाचे नेतृत्व कॉंग्रेसच्या तालमीत कि आशिर्वादात तयार झालेले भ्रष्टाचार आणि कॉंग्रेस ह्या सबधात म्या पामराने काय बोलावे ? मला प्रश्न पडतो तो एवढाच की कॉंग्रेस हे भ्रष्टाचाराचे दुसरे नाव आहे की भ्रष्टाचार हे कॉंग्रेसचे दुसरे नाव आहे ? विद्यार्थी आदोलनातला दुसरा महत्त्वाचा घटक (निदान मराठवाड्यात तरी !) म्हणजे युक्राद ! युक्राद म्हणजे कुमार सप्तर्षि हे समीकरण बहुधा कुमारनीच पॉप्युलराईझ केलेले आहे. त्यामुळे प्रत्येत युक्रादवाल्याला वाटते आपण कुमारच झाले पाहिजे. आता डॉक्टर असल्यामुळे कुमारला ते शक्य होत असेल. पण इतराना ?...

'...ओघाने आलेय तर कुमाराचे मराठवाड्यातले कानावर आलेले एक-दोन किस्से ऐकवतो. कुमार औरगाबादेत आले होते. तिथे त्याना कळले औरंगाबादला कुणी म्हातारी बाई आजारी आहे. तिचा युक्रादशी सबध आहे. बघायला जाणे आवश्यक होते. रेल्वे, बस उपलब्ध असूनही कुमारांनी टॅक्सी केली. जाऊन येऊन यजमानाना २५० रु. चा भुर्दंड आणि यजमानाचा कोपरापासून नमस्कार !...अशीच बीड का आबेजोगाई कुठेतरी त्याना कॉलेजवर गेटमिटीग घ्यायची होती. कुमार उतरले होते तिथून जेमतेम फर्लांगावर कॉलेज होत. पण तिथे जायला कुमारानी जीपची मागणी केली.... माफ करा सोमण, कुमारविषयी मी एवढ बोलतो आहे कारण माझ्या व माझ्यासारख्या अनेकाच्या त्याच्याविषयी फार फार अपेक्षा होत्या. But he has turned out to be a perfect individualist. जातीचा हुशार, धडपड्या, चळवळ्या, रिफॉर्मिस्ट आहे खरा, पण स्वत.ला केंद्र बनवून त्यानं स्वत भोवती वलय तयार केल आहे. त्याबाहेर कुमार येऊच इच्छित नाही. He thinks too much of himself. त्यामुळेच, मराठवाड्यातल्या चळवळीचा, तुमच्या भाऊ पाध्याच्या भाषेत त्यानी चकणाचूर करून टाकला आहे....

'...जाऊ द्या. विषयातर झाल. पण 'युक्राद' ह्या एका चागल्या चळवळीचे मातेरे होते म्हणून हळहळ वाटते. मी स्वत: 'युक्राद'चा कार्यकर्ता होतो. म्हणून भावना अनावर होतात...'

श्री. गभीरानी सागितलेल्यात अतिशयोक्ती असण्याची शक्यता आहे. त्यासाठीच मी तिकडे काणाडोळा करणारही होतो. पण नतरच्या चार-पाच दिवसात, मराठवाडाभर हिंडताना वरीलप्रमाणेच स्वत.ची मते मला कित्येकानी ऐकवली. त्यातले काही कट्टर 'युक्राद' विरोधक असले तरी, बहुसख्य विद्यार्थी, तरुण 'युक्राद'शी अजूनही नाते सागणारेच होते. 'युक्राद'च्या स्वतत्र व्यासपीठाची घोषणा झाल्यावर पुन्हा 'समाजवादी' पक्षात आलेलेही अनेक होते. 'युक्राद'विषयी व्यक्तिश: मला देखील जवळीक वाटते. मराठवाडा हा 'युक्राद'चा खरा एकमेव बालेकिल्ला. पण तिथेही 'युक्राद'विषयीची वरील मते मला मोठ्या प्रमाणावर ऐकायला मिळाली. त्यात तथ्य आहे असे मानायला वाव आहे. म्हणूनच, काही आत्मसंशोधन झाल्यास, ही मूळत: चागली सघटना, पुन्हा सावरून उभी राहू शकेल असे वाटल्यामुळे मी वरील प्रपच केला. 'युक्राद'वाल्याचा रोष होईल हे गृहीत धरूनही !

श्री. गभीरांनी असाच हल्ला अभाविपवरही चढवला. 'आदोलनात त्या मानाने हिंसाचार कमी झाले पण जे झाले त्याला अभाविप आणि जनसघाच्या लोकाची भडक भाषण कारणीभूत झाली. ही मडळी आजकाल बोलायला लागली की, डावे कम्युनिस्टही मागे पडतील इतके जहाल बोलतात. पण प्रत्यक्षात कृतिची वेळ आली की चार हात लाब.. असले हे आदोलन, भाईसाब, कसला व्यापक पाया न कसले काय ? साधे कोऑर्डिनेशन देखील नव्हते. तरीही हे आदोलन एवढे पेटले त्याचे खरोखरच कौतुक वाटते. आणि त्याचे एकमेव कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात असलेली आत्यतिक चीड. त्या चिडीला योग्य वळण कुणी देऊ शकले नाही म्हणून आदोलन फसले. वळण देणे नेतृत्वाला शक्य नव्हते, कारण नेतृत्वच भ्रष्ट होते, अहगड होते... काही मागण्या पदरात पाडून घेऊन आदोलन आखडते घेतले असा प्रचार चालू आहे. पण हा दावा पार फसवा आहे...'

श्री. गभीराबरोबरची चर्चा सपवून झोपायला रात्रीचे दोन वाजून गेले होते.... ◘

दुसऱ्या दिवशीची सकाळ उजाडली ती एक माझ्या दृष्टीने चांगली बातमी घेऊन. 'वसमत'च्या हुतात्म्याची स्मरणज्योत त्यादिवशी औरंगाबादेत यायची होती. २७ मेला ही स्मरणज्योत घेऊन वसमतहून आठ विद्यार्थी निघाले होते. सपूर्ण मराठवाडाभर

## विद्यार्थ्यांच्या मनात असलेली आत्यंतिक चीड !

हिंडून त्यादिवशी ती ज्योत औरंगाबादेत येऊन तिथेच तिचं विसर्जन व्हायचं होतं. विसर्जनानतर मोढयावर सभा झाली. बोलले तीन-चार वक्तेच पण प्रत्येकाचा सूर वेगळा दिसला. श्री. सुंदर गव्हाणे ह्या बीडच्या विद्यार्थ्याने हुतात्म्याच्या बलिदानाची आठवण करून देऊन बेकारी विरुद्धचा लढा पुन्हा उभा करण्याची हाक दिली तर ज्योत घेऊन येणाऱ्यापैकी एकाने, श्री. अशोक देशपाडे ह्यानी, जविपचा, समन्वय समितीचा, कृतिसमितीचा आदोलन स्थगितीचा निर्णय आपल्याला मान्य नसल्याचे सागून, ' आदोलन चालूच आहे, चालूच राहील – अतिम विजय मिळेपर्यंत ' असे दणकून सागितले. कृतिसमितीचे एक नेते श्री कानगो (युक्राद) भाडवलशाही विचार-सरणी बदलायला हवी असे सागून त्यासाठी सर्व तयारीनिशी सर्वंकष लढा द्यायला हवा असे सागितले. तर, ' आपण ज्या मागण्या पुढे केल्या व ज्याच्याविषयी निश्चित आश्वासने मिळवली त्याच्या पूर्ततेसाठी सरकारला काही कालावधी मिळू देणे आवश्यक आहे म्हणून हे आदोलन तात्पुरते स्थगित केले आहे. मागे घेतलेले नाही.... भ्रष्टाचार, बेकारीविरूद्ध व विकासासाठीही पुन्हा लढा द्यायचाच आहे. अशा लढयात विद्यार्थ्यांना नागरिकांचा पाठिंबा आतासारखाच राहील. ' असा आस्ते कदम सूर श्री. गोविंदभाई श्रॉफनी लावला.

## महिषी जानी होण्याचे स्वप्न

मुसाचे श्री. राजूरकर सभेला होते. पण सभेत बोलले, मात्र नाहीत. म्हणून सभेनतर मी त्याना मुद्दाम गाठले. आदोलनाच्या शेवटच्या टप्प्यात विद्यार्थ्यांची एकी जी निकालात निघाली तिची सपूर्ण जबाबदारी त्यानी ' युक्राद ' वर टाकली. '...परभणीला समन्वय समिति रद्द-ठरवली गेली. हे उत्स्फूर्तपणे घडले नाही. आम्ही सर्व मुबईला पोचेपर्यंत विद्यार्थ्यांमधले परस्परविरोधी गट एकी टिकवून होते. नागरिक समन्वय समितीही आमच्या बरोबरच होती. परीक्षा द्याव्यात व नतर पुढचा दणका नव्या वर्षाच्या सुरुवातीला द्यावा ह्यावर बहुतेक सर्वात एकवाक्यता होती. पण मुबईला पोचल्यावर किंवा पोचताना, पुण्याहून कुमार कडून विशिष्ट लाईन ' युक्राद 'ला मिळाली. मुबईला सह्या करून परततात्क्षणी ' युक्रांद ' वाल्यानी आपली मते बदलेली. मुबईला ' मुसा 'वाले फिरले असा खोटा प्रचार विजय गव्हाणे, सुदर गव्हाणे, कानगो वगैरेनी मराठवाडाभर दौरे काढून केला. मुसाला बदनाम केले. आम्ही गाफील राहिलो. नतर ११ मे ते १३ मे पर्यंत मुसाला बाजूला सारून नवीन कृती समिति तयार करून हे आदोलन पुढे चालवले. काय मिळवले ह्या आदोलनाने ? काहीही नाही ! उलट विद्यार्थ्यामधली एकी पार विघडवून टाकली. वीस दिवस सर्वांचे फुकट घालवले. नागरिकाची सहानुभूती गमावली. ११ मे ला जेवढे मिळवले होते तेवढयावरच काहीही ज्यादा मिळविता ३१ मे ला कृतिसमितीने आदोलन मागे घेतले. म्हणजे हे वीस दिवस आंदोलन चालू ठेवण्यात काही मतलब असा नव्हताच. मुसाला बदनाम करण्यासाठी कृति-समितीच्या बुरख्याखाली युक्रादने खेळलेली ही खेळी होती. मुसा आणि कॉंग्रेसचा बळी देऊन, विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळून महिषी जानी व्हायचे स्वप्न काही जण पाहात होते. (इथे हे स्पष्ट केले पाहिजे की ' मुसा ' आणि कॉंग्रेसचा काही एक संबध नाही. मी स्वत. AISF (उजव्या कम्युनिस्टाची विद्यार्थी सघटना !) चा सदस्य आहे. मुसाचे उपाध्यक्ष ज्ञानोबा मुढे SFI ( डाव्या कम्युनिस्टाची ! ) चे आहेत. उलट आम्ही कॉंग्रेसच्या विरोधातच आहोत. पण युक्रांदने स्वतःच्या स्वार्थासाठी तसला प्रचार चालवला. दुर्दैवाने आमची आजची अवस्था अशी आहे, की सर्वांना सामावून घ्यायचा प्रयत्न करताना आम्ही सर्वांची दुष्मनी ओढवून घेतली आहे–कॉंग्रसची, विरोधी पक्षांची, विद्यार्थ्यांची ! ) ह्या महिशी जानी स्वप्नामुळे युक्रादने मुसाच्या बदनामी व्यतिरिक्त काही मिळवलं नाही. ' मुसा 'चे कार्यकर्ते नेहमीचे व ठराविक विचार-प्रणालीचे नसतातच, दरवर्षी ते बदलत राहातात. उद्या कदाचित विविध कॉलेजातून युक्रादचे प्रतिनिधीच निवडून ' मुसा 'वर गेले तर ' मुसा 'चा ताबाच युक्रादकडे जाऊ शकेल. तेव्हा ' मुसा 'च्या बदनामीत देखील युक्रादची कमाईपेक्षा गमाईच जास्त होती... शिवाय ह्या खेळीनी युक्रादने मराठवाड्यातल्या विद्यार्थी चळवळीचे भरून न येणारे नुकसान केले आहे. ज्या स्वार्थी पद्धतीने त्यानी ११ ते ३१ मध्ये आंदोलन चालवले, त्यामुळे नजिकच्या काळात विद्यार्थ्यांचे पुन्हा आदोलन उभ राहील ही शक्यता मला तरी मुळीच वाटत नाही...'

शेखर राजूरकर बोलायला, वागायला पॉलिश्ड वाटले. त्याची मतेही त्यानी स्पष्ट माडली. त्याचा मुख्य रोख युक्राद विरुद्ध आढळला. युक्रादच्या कानगो वगैरे मंडळीशी बोलताना अर्थातच त्याचा राग ' मुसा 'वर आढळला '...शेखरनी सागितले त्यात काही तथ्य नाही. उलट आमची भूमिका प्रथम पासून बहुसख्य विद्यार्थ्यांचा कल पाहून त्या दिशेने पावले टाकण्याकडे होता. प्रथमपासून आम्ही त्याच्याबरोबर राहिलो. उलट ' मुसा 'चे विद्यार्थी समन्वय समित्याना हजर राहात नसत. कृती समितीचे विद्यार्थी इतरत्र गुतले असताना मुबईला जायचा बूट निघाला. विद्यार्थ्यांची समती ह्या समितीने काही बोलणी करण्यासाठी मिळालेली नव्हती. मुबईलाही जमलेल्या असख्य विद्यार्थ्यांनी जी अर्धी-मुर्धी समन्वय समिति तिथे हजर होती, तिने कुठलेही निर्णय घेऊ नयेत असे बधन समितीवर घातले गेले होते. फक्त विजय गव्हाणेनी हे बधन पाळले. Under Protest सही केली. निर्णय परभणीच्या मेळाव्यात घेऊ म्हणून सागितले. फक्त ' मुसा 'ने विद्यार्थ्यांना दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासला...मराठवाड्यात परतल्यावर जेव्हा आबेजोगाई मेळाव्यात विद्यार्थ्यांनी बहुसख्येने आदोलन चालू ठेवण्याकडे कल दाखवला, तेव्हा आम्ही आदोलन जारी ठेवण्याचा निर्णय घेतला. नागरिक समन्वय समितीने सह्या केल्या तेही आम्हाला खटकले होते समन्वय साधायचा एवढे जरी ठरले असले तरी नागरिक व विद्यार्थी ह्याना आपापल्या कृती ठरवण्याबाबत स्वातंत्र्य होते. त्यामुळे श्रॉफ, भालेराव आदीशी त्यानी घेतलेल्या भूमिकेबद्दल आम्ही वाद घातले, तरी त्यानी घेतलेले निर्णय त्याच्यापुरतेच मर्यादित असल्याने, ते बदलून घ्यायचे आम्हाला काहीच कारण नव्हते. मात्र विद्यार्थी समन्वय समितीने मुबईला निर्णय घेणे आक्षेपार्ह होते. एक तर मुबईला पोचलेली समिति ट्रकेटेड होती. दुसरे असे की असा कुठलाही निर्णय घेऊ नये असे बधन विद्यार्थ्यांनी समितीवर घातलेले होते. मुबईला पोचलेली ट्रकेटेड समिति खऱ्या अर्थाने मुसाचीच होती. ' मुसा 'वर विश्वासघाताचा आरोप तो

ह्याचमुळे...तुम्हाला खोटे वाटेल पण एकीकडे विद्यार्थ्यांचे आंदोलन छेडायचा आव आणला जात असताना दुसरीकडे 'मुसा' + काँग्रेसचे गुड दारू पाजून विद्यार्थ्यांवर सोडले जात होते–कृती समित्याशी त्यानी फटकून वागावे म्हणून ! चाकू दाखवण्याचे प्रकारही अनेक ठिकाणी घडले...दलित पँथर्सनी देखील त्याना साथ दिली... शेखर राजूरकर हा AISF चा सदस्य आहे हा सशोधनाचा विषय व्हावा. (आणि असला तरी शेवटी इदिरा-डागे युती आहेच की ! इति, दुसरा एक !) खुद्द AISF त्याच्या सदस्यत्वाचा इन्कार करते. मुद्दे SFI चा कबूल, पण त्याने 'मुसा'चा राजिनामा दिला आहे इकडे लक्ष द्याल की नाही ? वरवर पाहाता मुसा ही सघटना अपक्ष असायला हवी. परतु कॉलेजातल्या निवडणुकात चालणारे राजकारण, त्यावरचे एकूण काँग्रेसी वर्चस्व, ह्यामुळे 'मुसा'वर प्रभूत्व काँग्रेसला जवळ असणाऱ्यांचेच कसे असेल इकडेच खास लक्ष पुरवले जाते. आ. बाळासाहेब पवार ह्या बाबतीत एकदम तल्लख !

'मुसा' 'युक्राद'च्या ह्या लाथाळ्या. दलित आणि मुसलमान विद्यार्थी आदोलनापासून फटकूनच ! तर उरलेल्यात, अभाविप, एस. एफ. आय, ए. आय. एस एफ ह्या साऱ्याचा मुसा आणि युक्रांद दोघानाही विरोध करीत आपआपसातही तोड वेगवेगळ्या दिशांना ! अशा विद्यार्थ्यांचा खास जोर नादेड, परभणी, आंबेजोगाई, वसमत, बीड, उदगीर वगैरे ठिकाणी. हा विरोध मला नादेडला फार चागला पाहायला मिळाला. विद्यार्थी कृती समितीच्या बैठकीत नेते (म्हणजे इथे युक्रादच !) विद्यार्थ्यांची दिशाभूल करताना त्याना विश्वासात न घेता, विद्यार्थ्यांमध्ये अप्रिय झालेल्या श्रॉफ, भालेराव, कुमार ह्याच्याकडून लाईन घेऊन मनःपूत निर्णय घेतात हा साधारणत विरोधीच सूर मला जाणवला. 'मुबईला निर्णय घेतला त्यात ह्या युक्रादवाल्याचाही सहभाग होता. आंबेजोगाई, परभणी येथील गाजलेल्या सभाच्या आधी, खासगीत बोलताना आदोलन मागे घ्यायचा सूर विजय वगैरे लावायचे; पण प्रत्यक्ष सभेत मात्र सारे गुळमूळ बोलायचे. सभेत विद्यार्थ्यांना आदोलन चालू ठेवण्याचे आश्वासन मिळायचे. नतर सभेबाहेर किंवा दुसऱ्या दिवशी विजय वगैरे आपसात निर्णय घेऊन ते विद्यार्थ्यांवर लादीत. परभणीच्या गाजलेल्या सभेला कुलगुरु नाथाना बोलावण्याचा निर्णय असाच, विद्यार्थ्यांना, कृतिसमितीला विश्वासात न घेता केला गेला. जनरल बॉडी डावलून...

विद्यार्थ्यांच्या विविध गटात असे अतर्गत कलह होते. वाद होते तेही फारसे तात्त्विक नव्हते काहीसे स्वार्थमूलकच होते. ह्या अतर-कलहाप्रमाणेच, उस्मानबाद जिल्ह्याचे विद्यार्थी (व जनताही !) फारशा मोठ्या प्रमाणावर आदोलनात सहभागी झाले नव्हते. तिथे जिल्हातर्गत उस्मानाबाद विरुद्ध लातूर असा वाद चालू असतो. मागे एस. टी. विभाग प्रश्नावरून तिथे मोठे वादळ झाले होते. एस. आर. पी.च्या काठ्या मनसोक्त फिरल्या होत्या. पण त्यावेळी बाकीचा मराठवाडा त्या आदोलनाविषयी अगदी उदासीन होता. त्याचप्रमाणे मराठवाड्यात असूनही, उस्मानाबाद जिल्ह्याचे सास्कृतिक, राजकीय, व्यापारी व इतर सबध सोलापूरशी जास्त जवळचे आहेत.

विद्यार्थ्यांच्या आदोलनाची, अतर्गत कलहानी वाट लागत असताना, कुलगुरू नाथाना आपली प्रतिमा मात्र काहीशी उजळून घेता आली. परभणी सभेला त्याना बोलावून विद्यार्थ्यांनीच तशी सधी नाथाना मिळवून दिली. विद्यार्थी खवळलेले आहेत हे नाथाना माहीत होते. जमाव मोठा आहे हेही माहित होते. विद्यार्थ्यांना मुबईला घेतले गेलेले निर्णय मान्य नाहीत हेही एव्हाना स्पष्ट झाले होते. एवढे सारे असूनही नाथांनी सभेचे आमत्रण स्वीकारले. सभेला ते गेले. आणि खवळलेल्या ५।७ हजाराच्या सभेत त्यानी भाषणही केले. विद्यार्थ्यांच्या भावनाच्या विरोधी भाषण असे धैर्य दाखवणारा एखादा कुलगुरू देशात असेलसे वाटत नव्हते. कुलगुरू नाथाविषयी असख्य आरोप आहेत. भ्रष्टाचार, वशिलेबाजी, अरेरावी, राजकीय वगैरे वगैरे त्यात तथ्यही खूपच आहे. पण असे असूनही ह्या सभेला उपस्थित राहून नाथानी बाजी मारली ह्यात वादच नाही. उलट सभेत गोधळ माजला, विजय गव्हाणेंना सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने दिलगिरी प्रदर्शित करावी लागली. ह्यामुळे विद्यार्थ्यांची बाजू आणखीनच कमकुवत झाली... ◻


# मुंबई (भ्रष्टाचार) विश्वविद्यालय स्फोट पहिला

रजिस्ट्रार चिदम्बरन १९६१।६२ मध्ये खरे सत्ताधीश झाले. तेव्हापासून गेल्या बारा वर्षात, एकूण बांधकाम झालं सुमारे २। कोटींचं. त्यात अफरातफर आहे सुमारे पाऊण कोटीची. सुमारे ३३%. ह्याशिवाय परीक्षा विभागातला भ्रष्टाचार आहे तेवढाच ! विद्यापीठाचा पैसा हा एका अर्थी सार्वजनिक पैसाच. त्याचा एवढा गैर कारभार. ज्या विद्यापीठातून उद्याचे जबाबदार नागरिक बाहेर पडायचे, तिथे हा भ्रष्टाचार चालतो. ह्या दृष्टीने ह्या भ्रष्टाचाराची किंमत फार फार मोठी आहे.

— कुलगुरूंचं निवासस्थान, सभागृह, होस्टेल वगैरे वगैरे.

**माणूस मधून लवकरच**


विद्यार्थ्यांमध्ये जशी अंतर्गत फाटाफूट होती तशीच ती आदोलनाच्या दुसऱ्या घटकातही होती. मुळात, जनता विकास परिषदेत अनेक पक्षाचे लोक आहेत. श्रॉफ, भालेराव ही समाजवादी विचार-

पृष्ठ २४ वर

# सोलकढी

## □ चालणाऱ्यांच्या सोयीसाठी

इंद्रपुरी मी साक्षात पाहिलेली नाही. परंतु ती कशी असेल याची मला थोडीशी कल्पना आहे; कारण महानगरी मुंबईच्या दक्षिणटोकाकडला फोर्टविभाग माझ्या परिचयाचा आहे. या विभागात सगळे कसे झकपकझकास आहे: भव्य, रुबाबदार इमारती; जिभेचे आणि जिवाचे नाना चोजले पुरवणारी खाद्यगृहे व करमणुककेंद्रे; ऐसपैस व ऐटबाज रस्ते आणि उपरस्ते; सतत भोगावणारी वाहने; अखंड चालणारी अद्ययावत माणसे; आणि एक रंगबाज गुंगी आणणारे एकूण वातावरण; यामुळे या विभागाकडे माझी पावले पुन्हा पुन्हा वळतात.

त्या विभागात मी काम करत नाही. त्यामुळे मला तेथे सक्तीने जावे लागत नाही. म्हणजेच फोर्टविभागाचे कौतुक मी गरजेला गुणविशेष मानून करत नाही. ते निखालस ऊत्स्फूर्त व निर्हेतुक आहे. तेथे मी वारवार जातो; त्यामुळे आयुष्य वाढते अशी माझी प्रामाणिक समजुत आहे हे, बहुधा माझ्या वाईटावर असलेल्या कोणाच्यातरी लक्षात आले असावे. कारण फोर्टमधे जाण्यातले मुख्य आकर्षणच आता लुप्त झाले आहे. यामागे ज्यांचा ज्याचा हात आहे त्याचे तिरंगीतळपट झाल्यावाचून राहणार नाही.

फोर्टमधे काम नसताना मी केवळ कलात्मक जो जायचो तो मुख्यत तेथल्या पायपथावर हारीने थाटलेल्या रंगीबेरंगी दुकानातून देशोदेशीच्या अनोख्या आणि अनमोल चिजा खरेदी करायला. यासाठी काही लोक मुद्दाम देशोदेशी जातात, मी आपला उठायचो आणि फोर्टमधे जायचो. तेथे टवटवीतपणे माडून ठेवलेल्या वस्तूच्या नुसत्या दर्शनानेसुद्धा चित्ताला अपार सतोष व्हायचा. कचेरीत जातायेता रोज दोन वेळा या मोफत करमणुकीचा लाभ मुंबईकर उठवायचे. त्यासाठी रस्त्यातून चालणे त्यांनी सोडून दिले होते. ते सगळे आपले पायपथावर गर्दी करायचे. या त्यांच्या धटिंगपणामुळे दुकानवाल्याची केवढी गैरसोय व्हायची. पण ते दुकानवाले कधी चिडले नाहीत; कावले नाहीत; पब्लिकला उलटा त्रास त्यानी दिला नाही; आपली जादूची चिमुकली दुकाने सौजन्याने सांभाळत त्यानी पब्लिकची सेवा केली.

मी काही इतर मुंबईकरासारखा या दुकानांपासून मोफत करमणुकीचा लाभ उठवत नव्हतो. मी खूप कष्ट करून थोडे पैसे साठवायचो आणि फोर्टात जाऊन चित्र विचित्र वस्तू खरीदायचो. अशा शानदार (इंग्लडमध्ये चाललेल्या कसोटी सामन्याचे जसदेवसिंगी समालोचन ऐकल्याचा हा परिणाम.) वस्तूनी आणि उपकरणानी माझ घर भरून गेले आहे. त्यामुळे माझ्या घरी पुष्कळ माणसे येतात. माझ्या घरातल्या मत्स्यालयात खऱ्या माशासारखे दिसणारे व पोहणारे प्लॅस्टिकचे मासे आहेत. त्यांना मधूनमधून प्लॅस्टिकची पोरेसुद्धा होतात. एक जपानी बाहुली आहे ती दर पाच मिनिटानी नाजुक जाभई देते. एक अरेबियन चाकू आहे त्याने फळे न कापता त्यातल्या बिया तेवढ्या काढता येतात. एक ब्राझिलियन सिगारेटलायटर आहे त्याने लिहिता येते, बंद डबे व कुलुपे उघडता येतात, कायम दाढी करता येते, शत्रूच्या डोळ्यात तिखटाची पूड मारता येते, भाग पाडता येतो, दात घासता येतात, एक कळ दाबली की त्याचा गॉगल होतो आणि दुसरी कळ दाबली की त्याचीच छत्री होते; शिवाय त्याने सिगारेट आपली पेटतेच. एक अद्‌भुत अमेरिकन यंत्र आहे त्यात कोणत्याही फळाचा रस एका बाजूने घातला की दुसऱ्या बाजूने ते फळ अलगद आपल्या हातात पडते. त्या यंत्रात सोललेली कोबडी घातली तर पिसेवाली आणि जिवत कोबडी मिळू शकेल असे यत्र घेताना त्या दुकानदाराने सागितले होते. ते खरे असले पाहिजे. परतु मी कट्टर शाकाहारी असल्यामुळे सोललेली कोंबडी यत्रात घालून ते विटाळू शकत नाही. असो. माझ्या घरच्या अजबखान्याचे वर्णन करावे तेवढे थोडेच. त्याने माझे जीवन सुखी आणि समृद्ध झाले आहे.

त्यासाठी मला भरमसाठ पैसे खर्च करावे लागले असतील अशी जर तुमची समजुत असेल तर ती अर्धवटच बरोबर आहे. हां आता काही खास चिजाना पडले भरपूर पैसे; पण भरपूर म्हणजे भरमसाठ नव्हेत; ते अर्थात मानण्यावर आहे; शिवाय जशी वस्तू तशी किंमत द्यायला मी तरी बाबा नेहमीच तयार असतो. मात्र मला काही अफलातून वस्तू एकदम सस्त्या मिळाल्या आहेत. उदाहरणार्थ, घराला रंग लावायचा एक छोटासा यांत्रिक ब्रश मला अवघ्या दहा रुपयांना मिळाला. आता त्याला योग्य असा रंग इथे मिळू शकत नसल्यामुळे मला तो ब्रश वापरता येत नाही हा भाग वेगळा; पण त्याची किंमत फारच कमी आहे हे कोणीही मान्य करील; अवघ्या एक किलो मटारला कधी कधी आपण दहा रुपये देतोच की. शिवाय या ब्रशची किंमत त्या दुकानदाराने सुरुवातीला नगद शभर रुपये सांगितली होती. पण मी घासाघीस करण्यात वस्ताद आहे. काही लोकाना दुकानदार सांगेल ती किंमत देण्यात मोठा डौल वाटतो. मला वस्तू घेण्यापेक्षा घासाघीस करण्यातच अधिक सुख होते. त्यामुळे पोस्टातसुद्धा घासाघीस करायला सोडत नाही मी! फोर्टमधल्या त्या पादपथारी दुकानदारांशी सौदा पटवताना घासाघीस केल्याचे जे बेहिशेबी सुख मी अनुभवले त्याला पर्याय नाही.

सौजन्यसप्ताहात बसकडक्टराची असते तशी या दुकानदारांची नेहमीची वागणुक होती, असा माझा अनुभव आहे. विकत न घेता कितीतरी वस्तू मी तासचे तास हाताळायचो, पण एकाही दुकानदाराने मला कधी उद्धटपणे मनाई केली नाही. कधी मी वस्तू घेऊन जायचो, आणि मग पैसे द्यायचो. माझ्या हातून मोडलेले एक उपकरण एकदा एका दुकानदाराने विनातक्रार परत घेतले आणि मला दुसरे दिले. हवी असलेली गोष्ट आणून देण्यासाठी हे दुकानदार वाटेल ते करायला तयार असायचे. या बाबतीतला माझा अनुभव अत्यत बोलका आहे. मुंबईतल्या वाहनाना मी पार कटाळलो होतो. गाडी, बस, सायकल, स्कूटर, मोटार, टॅक्सी सगळीच वाहने त्रासदायक व गैरसोयीची. तेव्हा एक घडीचे हेलिकॉप्टर घ्यावे, असे माझ्या मनात आले. या हेलिकॉप्टरने मला

कोठून कोठेही जाता येणार होते; गर्दीचा जाच होणार नव्हता; आणि घडी करता येणार असल्यामुळे ते कोठेही ठेवता येणार होते. माझ्या मनात असे काही फक्कड आल्यामुळे माझ्या मनाचे मीच शानदार कौतुक केले. दोन-पाच हजार रुपये द्यायची तयारी ठेऊन मी फोर्टातल्या माझ्या नेहमीच्या दुकानदाराकडे गेलो. सुरुवातीला उगाचच काही वस्तू हाताळल्या; काहीची किंमत विचारली, फुटकळ चौकशी केली; आणि मग माझा शेलका प्रश्न विचारला.

'देखो भाई, मुझे एक फोल्डिंग हेलिकॉप्टर मंगता है–' मी

'कौनसा मेक? अमेरिकन? फ्रेंच? कॅनेडियन? युगोस्लाव्हियन?' दुकानदार.

फोल्डिंग हेलिकॉप्टर्स युगोस्लाव्हियाची चागली असतात अशी माहिती मी आधीच काढली होती. त्यामुळे मी साटकन उत्तर दिले, 'युगोस्लाव्हिया मिलेगा तो अच्छा होगा. लेकिन उसको शायद पैसे जादा पडेंगे?'

'पैसे छोडो. माल नही है मेरे पास.'

माझ्या मनात आले तसेच काही फक्कड पुष्कळ जणांच्या मनात आले असावे आणि त्यांनी इथे येऊन भराभर फोल्डिंग हेलिकॉप्टर्स खरेदी केली असावीत असे मला वाटले. तेवढ्यात, दुकान माझ्यावर सोडून तो बहाद्दर दुकानदार आजूबाजूला जाऊन युगोस्लाव्हियन फोल्डिंग हेलिकॉप्टर कोणाकडे आहे काय ते पाहून आला. मग तो म्हणाला, 'साब, अभी अभी तो हेलिकॉप्टर नही मिल सकता. लेकिन हमारा एक आदमी युगोस्लाव्हियामें है–'

'कौन जी? मार्शल टिटो?' मी न राहवून विचारले. कारण युगोस्लाव्हियातल्या एवढ्या एकाच माणसाचे नाव मला ठाऊक होते.

'नामवामसे क्या करना? एक आदमी है. उसे पूछुंगा. अच्छा, आपको एक सीटका हेलिकॉप्टर चाहिये या दोन सीटका? पखा नीचे चाहिये या ऊपर?'

त्याला हवा तो तपशील मी पुरवला. आता लौकरच आपले फोल्डिंग हेलिकॉप्टर येणार आणि मग आपल्याला इतर वाहनांवर अवलबून राहावे लागणार नाही, असे मनातल्या मनात सुख चुरत वाट पाहत होतो मी. इतक्यात ती अशुभ बातमी वाचायला मिळाली: मुबईच्या पोलिसानी फोर्टमधल्या समस्त फेरीवाल्याची निर्दयपणे उचलबागडी केली. हजारो गरीब आणि फेरीवाले बेरस्ता झाले.

मी ताबडतोब फोर्टमध्ये गेलो. तुम्हाला सागतो, तेथल्या त्या मोकळ्या पायपथावरून मला चालता येईना. दोन चारदा मी अडखळलो. मधे काहीच न आल्यामुळे मला ठेचा लागल्या. पायपथावर एक दुकान नव्हते; एक फेरीवाला नव्हता. पूर्वीच्या विधवांच्या कपाळासारखे दिसत होते सारे पायपथ. सरकारने म्हणे चालणाऱ्याच्या सोयीसाठी या दुकानाचे उच्चाटन केले आहे; माझ्या मते चालणाऱ्यांच्या सोयीसाठीच ही दुकाने पायपथावर तशीच ठेवायला हवी होती. दुकाने होती तेव्हा किती व्यवस्थित चालता यायचे; चालण्यात एक प्रकारची अदब आणि शिस्त असायची; धक्के लागले तरी कोणी तक्रार करीत नसे. परवा पाहतो तो त्याच पायपथावरून माणसे अजागळासारखी चालत होती; रेंगाळत नव्हती; धक्के देत घेत होती आणि वर भांडण करीत होती! ◻

## ◻ डिनेसच्या कौतुकाचा डोंब

आपला क्रिकेटसंघ सारखा हरू लागला म्हणजे नेतृत्वात बदल करायची इग्लडची रीत आहे. या रीतीला अनुसरून रे इलिंगवर्थला कर्णधारपद मिळाले. त्याने खरोखरच इग्लडला लागोपाठ विजय मिळवून दिले. पण १९७१ साली अजित वाडेकरने त्याचा नक्षा उतरवला. मग इलिंगवर्थ भ्याला. भारताच्या दौऱ्यावर तो आलाच नाही. येथे कर्णधार म्हणून आला टोनी लुईस. वाडेकरने त्यालाही धूळ चारली. त्यामुळे कर्णधारपद गेले माईक डिनेसकडे. त्याने वेस्ट इडिजविरुद्ध बरोबरी केली; आणि सध्या दौऱ्यावर असलेल्या अजित वाडेकरच्या भारतीय सघाची ससेहोलपट केली. त्यामुळे सध्या इग्लडचा राष्ट्रीय आनद तेथल्या ढगाळ गगनात मावेनासा झाला आहे.

भारताविरुद्धच्या मालिकेत विजय निश्चित झाल्यामुळे इग्लडचे सगळे तारतम्य सुटले आहे. 'दुसऱ्या महायुद्धातल्या विजयाहून अधिक भव्य व नेत्रदीपक विजय' असे या विजयाचे वर्णन एका प्रतिष्ठित वृत्तपत्राने केले आहे! त्या मागे, आपल्याला जगात बडे राष्ट्र मानले जात नाही, याबद्दलची खत असावी, असा माझा तर्क आहे. यातूनच माईक डिनेसच्या कौतुकाचा डोंब उसळला असला पाहिजे. ही मालिका सपल्यावर, माईक डिनेस आणि त्याचे विजयी सहकरी (रॉबिन हूड आणि त्याचे रंगेल गडी, या चालीवर) याचे इग्लडमधल्या प्रमुख शहरातून प्रचड सत्कार करण्यात येणार आहेत. या प्रसगी खेळाडूना मोठमोठ्या रकमाची व शानदार वस्तूची पारितोषिके देण्यात येणार आहेत. सगळ्या शहरांमधून विजयी सघाची मिजासी मिरवणूक काढण्यात येणार आहे. एका पत्रलेखकाने माईक डिनेसचा बेचाळीस (दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावातली भारताची धावसख्या) फुटी पुतळा उभारण्याची सूचना केली असून तिला चागला पाठिंबा मिळतो आहे. खुद्द माईक डिनेसला मात्र, या साघिक विजयात सगळ्याच खेळाडूचा सारखाच वाटा असल्यामुळे, सगळ्याचे पुतळे उभारावे, असे वाटते. इग्लडमध्ये २४ जून १९७४ रोजी जन्मलेल्या मुलाचे नाव 'माईक' व मुलीचे 'माईका' ठेवण्यात यावे, या एका पत्रलेखकाने केलेल्या सूचनेला सक्रीय प्रतिसाद मिळाल्याची वार्ता आहे. या विजयाची स्मृती चिरजीव राहावी म्हणून पोष्टाचे तिकीट काढण्यात येणार आहे. शिवाय माईक डिनेसला 'सर' ही मानाची किताबत देण्यात येणार आहे.

हे सारे चालले असतानाच, भारतात, इदूरच्या नागरिकांनी, इग्लडमधील भारताच्या लाजिरवाण्या पराभवाबद्दलची प्रतिक्रिया म्हणून, तीन वर्षांमागे उभारलेल्या विजयस्मारकाची मोडतोड केल्याची बातमी वाचायला मिळाली. (आता तरी आम्ही केलेल्या अणुस्फोटाबद्दल कोणाला आश्चर्य वाटायला नको.)

इग्लडमध्ये अशा स्मारकाचे संरक्षण करायची काही खास व्यवस्था आहे असे ऐकतो.

—अनंतराव

# मास्कोची शिखर परिषद

वा. दा. रानडे

निक्सन आणि ब्रेझनेव्ह याची दोन वर्षातील तिसरी शिखर परिषद मास्को येथे नुकतीच झाली. पुढील वर्षी ब्रेझनेव्ह अमेरिकेला भेट देणार असून वाटाघाटीचा धागा पुढे चालू ठेवणार आहेत. शिखर परिषदाचा मार्ग बडथा राष्ट्राना आपसातील प्रश्न सोडविण्यासाठी उपयुक्त वाटत आहे असाच याचा अर्थ आहे. तसेच दोन्ही बडथा राष्ट्राना एकमेकाचे सबध सुधारण्याची, सहकार्य वाढविण्याची आवश्यकता वाटत आहे हे उघड आहे.

दोन वर्षापूर्वीपर्यंत एकमेकांचे कट्टे शत्रू असलेल्या या बडथा राष्ट्राना सबंध सुधारण्याची आवश्यकता का वाटू लागली? आतरराष्ट्रीय आणि अतर्गत अशा दोन्ही प्रकारच्या कारणानी ही राष्ट्रे जवळ आली. आतरराष्ट्रीय मोठे कारण म्हणजे अणुयुद्धाचा धोका. दोन्ही राष्ट्रे मोठ्या प्रमाणावर अण्वस्त्रे तयार करू लागली. केवळ सख्येच्या दृष्टीने पाहिले तर अण्वस्त्राच्या बाबतीत अमेरिका रशियाच्या वरचढ आहे. अमेरिकेजवळ सध्या ७९४० अण्वस्त्रे आहेत. रशियाजवळ २६०० आहेत. म्हणजे रशियाच्या तिप्पट अस्त्रे अमेरिकेजवळ आहेत. मग अमेरिकेला रशियाची भीती का वाटते? याचे कारण अण्वस्त्राच्या बाबतीत सख्येच्या दृष्टीने वरचढ असण्याला लष्करीदृष्टया फारसे महत्त्व नाही. पहिला अणुहल्ला झाल्यानतर त्यातून बचावून प्रतिहल्ला करण्यासाठी पुरेशी शस्त्रे जवळ असणे हा अण्वस्त्र सामर्थ्याचा खरा निकष आहे. रशियाने त्या टप्प्यापर्यंत प्रगती केली आहे. आपण प्रथम अणुहल्ला केला तरी त्यातून बचावून प्रतिहल्ला करण्याचे सामर्थ्य दुसऱ्या राष्ट्राने मिळविलेले आहे अशी दोन्ही बाजूची खात्री पटल्यानेच आता अण्वस्त्र स्पर्धा वाढविण्यात अर्थ नाही या निर्णयाला दोन्ही राष्ट्रे आली. लाब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राना मर्यादा घालण्याची आवश्यकता त्याना वाटू लागली. त्यातूनच दोन वर्षापूर्वीचा पहिला ' सॉल्ट ' करार झाला. (सॉल्ट म्हणजे स्ट्रॅटेपिक आर्म्स लिमिटेशन ट्रेटी.) प्रत्येक बाजूने दोनशेपेक्षा अधिक क्षेपणास्त्रविरोधी अस्त्रे (अँटी बॅलिस्टिक मिझाइल्स) ठेवायची नाहीत अशी मर्यादा या कराराने घातली. आपल्या जवळील क्षेपणास्त्राच्या सख्येत वाढ करावयाची नाही हे दोन्ही बाजूनी मान्य केले पण सध्याच्या क्षेपणास्त्राचे जागी अधिक लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे तयार करण्याची मोकळीक ठेवण्यात आली. त्याचा फायदा घेऊन अधिक लाब पल्ल्याची आणि तांत्रिकदृष्टया अधिक परिणामकारक अस्त्रे रशियाने तयार केली आहेत. ' मर्व्ह ' म्हणजे मल्टिपल इडिपेडट टार्जेटेबल रिएन्ट्री व्हेइकल्स ' या तात्रिक नावाने ती ओळखली जातात.) सॉल्ट कराराचा दुसरा टप्पा या वेळच्या वाटाघाटीत पुरा व्हावयाचा होता पण तो होऊ शकला नाही. फक्त या कराराची काही तत्त्वे निश्चित करण्यात आली.

सॉल्ट कराराचा दुसरा टप्पा पुरा होणार नसेल तर पहिल्या कराराला काही अर्थ नाही. दुसऱ्या टप्प्याबाबत एकमत झाले नाही हे मॉस्को वाटाघाटीचे अपयश आहे. अमेरिकेने स्कॉटलडमधील होर्कर लॉच व स्पेनमधील रोटा येथील आपले अणुपाणबुडयाचे तळ काढून घ्यावेत, युरोपातील समुद्रात सचार करणाऱ्या विमानवाहू बोटीची संख्या कमी करावी, क्षेपणास्त्रांनी सज्ज पाणबुडया समुद्राच्या अशा भागात ठेवाव्यात की जेथून शत्रूप्रदेशावर ही अस्त्रे पोचू शकणार नाहीत, नव्या क्षेपणास्त्राच्या सशोधनाला बदी करावी अशा रशियाच्या मागण्या होत्या. त्या अमेरिकेस मान्य झाल्या नाहीत. वास्तविक अणुयुद्धाचा धोका टाळण्याच्या दृष्टीने या मागण्या अवाजवी होत्या असे म्हणता येणार नाही. रशियावरही अशाच स्वरुपाच्या अटी अमेरिका घालू शकली असती. पण अमेरिकेला एवढचात करार नको असावा. याचे एक कारण अमेरिकेला रशियाप्रमाणेच चीनशीही सबध सुधारावयाचे आहेत. तेव्हा असा करार करण्यापूर्वी चीनशी बोलणी करणे अमेरिकेला आवश्यक वाटले असावे.

चीनने काही दिवसापूर्वी अण्वस्त्राचा सोळावा स्फोट केला. मास्कोपलीकडे पूर्व युरोपातील ठाण्यावर हल्ले करू शकतील अशी प्रक्षेपणास्त्रे चीन जवळ आहेत. आता ' वॉर्सा ' नावाचे लाब पल्ल्याचे क्षेपणास्त्र चीन तयार करीत आहे. ते वॉर्सापर्यंत पोचू शकेल म्हणूनच त्याला ' वॉर्सा ' नाव दिले आहे. त्याची चाचणी चीनने केली असल्याच्याही बातम्या आहेत. ' वॉर्सा ' प्रमाणेच वॉशिग्टनवर हल्ले करू शकणारे 'वॉशिग्टन' हे लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र तयार करण्याच्या योजना चीनने पूर्वीच आखल्या होत्या. पण पेकिंगमध्ये अमेरिकेने संपर्क कचेरी उघडल्यानतर चीनने या योजना रद्द केल्या होत्या. पण अमेरिका व रशिया फार जवळ आले तर ही क्षेपणास्त्राची योजना चीन पुन्हा हाती घेण्याचा सभव आहे. म्हणूसच सॉल्ट करायचा दुसरा टप्पा पुरा करण्यापूर्वी चीनचे समाधान करणे अमेरिकेला आवश्यक वाटत असावे. हा करार न झाल्याने नवी क्षेपणास्त्रे तयार करण्याची स्पर्धा दोन्ही राष्ट्रे चालूच ठेवतील.

भारताच्या अणुस्फोटानतर भूमिगत अणुस्फोटाना बदी करण्याचा करार मास्को वाटाघाटीत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. दीडशे किलोटनपेक्षा अधिक शक्तीचे स्फोट भूगर्भात करण्यास बदी करणारा करार निक्सन व ब्रेझनेव्ह यांनी केला. भारताचा अणुस्फोट पधरा किलोटन होता म्हणजे त्याच्या दसपट शक्तीपर्यंतचे स्फोट ही दोन्ही बडी राष्ट्रे चालू ठेवणार आहेत. अधिक शक्तीच्या स्फोटांना त्यानी मर्यादा घातली आहे एवढेच हा करार पाळला जातो की नाही यावर निरीक्षण ठेवण्यासाठी स्फोटाचे जागी दुसऱ्या राष्ट्राचे निरीक्षक येऊ देण्याची सूचना रशियाने प्रथमच मान्य केली.

रशिया-अमेरिकेत दहा वर्षाचा आर्थिक सहकार्याचा करार मास्कोत झाला. रशियाला अशा कराराची अधिक आवश्यकता होती. अमेरिकेकडून धान्य आणि तांत्रिक ज्ञान रशियास हवे आहे. क्रांतीला ५७ वर्षे झाल्यानतर अजून या गोष्टीसाठी अमेरिकेवर अवलंबून रहाण्याची पाळी रशियावर आली याचा अर्थ रशियाच्या नियोजन कार्यक्रमात कोठेतरी चुकत आहे. कदाचित शस्त्रास्त्रावर अधिक खर्च करावा लागल्याने रशियाला यासाठी आतापर्यंत पुरेसा खर्च करणे शक्य झाले नसावे.

वॉटरगेट प्रकरणी निक्सन स्वत.च्या राष्ट्रात आपली प्रतिष्ठा गमावून बसले आहेत, आतरराष्ट्रीय क्षेत्रात मोठी कामगिरी करून ही प्रतिष्ठा सावरण्याचा त्याचा प्रयत्न होता. मास्कोची शिखर परिषद या दृष्टीने त्याना महत्वाची वाटत होती.

# संपूनही न संपलेली यवतमाळची वसंत व्याख्यानमाला

# लेको ! स्वर सोडू नका....

यवतमाळच्या नगर वाचनालयाने यदा धमाल उडवून दिली. एरवी शात, संथ असणारे हे शहर साहित्यसमेलन आणि त्याला खासदार धोटयांचा विरोध ह्या घटनेप्रमाणेच यावेळीही ढवळून निघाले होते.

या महोत्सवी वर्षात सर्वत्र जसे उत्सव यांत्रिकपणे 'साजरे' केले जातात तशी वासतिक व्याख्यानमाला 'साजरी' व्हायची नाही; विचार जागृतीचे महत्त्वाचे साधन म्हणून, प्रभावी माध्यम म्हणून, ती 'सार्थ' करायची ह्या प्राजळ दृष्टिकोन नगर वाचनालयाचे तरुण अध्यक्ष प्रा. शरद कळणावत यानी आरंभीच स्पष्ट केला. विषय नित्याच्या जीवनाशी निगडित–महत्त्वाचे, ज्वलंत आणि त्यावर बोलायला तरुण पण अधिकारी वक्त्याची निवड. फक्त बोलणारे म्हणून नव्हे तर व्याख्यान विषयाशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आंतरिक जिव्हाळयाचा सबध असणारे, त्या त्या क्षेत्रात स्वत: काम करणारे, प्रा. शरद कळणावत याच्या सयोजनाचे हार्दिक कौतुक करणारा यवतमाळातील रसिक श्रोतृवृंद सहाही दिवस बहुसख्येने हजर. नगरभवन स्त्री-पुरुषानी फुलून गेलेले होते.

**व्याख्यान पहिले : प्रा. केशव मेश्राम, मुंबई**
**मराठीचे नवे शक्तीकेंद्र 'दलित साहित्य'**

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून श्री. ग. दि. माडगूळकरानी 'दलित साहित्य' नावाने वेगळा संसार थाटणाऱ्यांबद्दल नापसंती व्यक्त केली होती. या सदर्भात यवतमाळकरांना या विषयाचे वेगळे महत्त्व वाटत होते. प्रा. केशव मेश्राम यांनी ज्या सुबोध पण मार्मिकपणे दलित साहित्या मागची भूमिका, प्रेरणा विशद केली, त्याने श्रोते प्रभावीत तर झालेच पण साहित्याची इतकी सखोल चर्चा इतक्या तळमळीने साहित्य समेलनातही झाली नव्हती ही भावनाही अनेक श्रोत्यांनी भाषणाची प्रशसा करताना प्रांजळपणे व्यक्त केली.

'दलित साहित्य हा मराठीचा सवता सुभा नाही. साहित्य आणि समाजाच्या अभिन्नत्वातून प्रस्फुटित झालेली ती नवी प्रभावी जाणीव आहे. केवळ साहित्याचीच नव्हे तर नव्या समाजाच्या सृजनाची प्रचड प्रेरणा या साहित्यामागे आहे. वाङ्मयाचे जुने निकष, कालपर्यंतची कलामूल्ये, नव्या साहित्याच्या मूल्यमापनास कधी निरुपयोगी तर कधी तोकडी पडताहेत. अशावेळी प्रचलित, प्रस्थापितापासून वेगळे म्हणून टाकाऊ असा ओरडा करण्यात अर्थ नाही. या नव्याचे म्हणणे आस्थेने समजावून घेण्यातच साहित्य आणि समाजाचेही खरे कल्याण आहे.'

'दलित साहित्याच्या रूपाने एका नवीन शक्तीचा उदय झालेला आहे. ज्ञानेश्वर, तुकारामाच्या मराठीचे थाबलेले पाऊल आता कुठे पुढे पडण्याची शक्यता दलित साहित्याच्या निमित्ताने निर्माण झालेली आहे. अशा वेळी केवळ विरोधासाठी विरोध म्हणून या अश्वत्थ वृक्षाचे बीज नष्ट करण्याचा करंटेपणा आपल्याकडे येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.'

'दलित साहित्याला अनुभवाची उसनवारी करावी लागत नसल्यामुळे ते जितके स्वयंस्फूर्त, स्वतंत्र आणि प्रभावी आहे तितकेच अनेक विरोधाना तोंड द्यावे लागल्यामुळे लढाऊ आणि शक्तीशाली आहे. त्यामागे नवसमाजनिर्माणाची प्रबल आकांक्षा आहे. ते जगाच्या राजकारणात स्वत चे पडसाद उमटविणाऱ्या 'दलित पँथर' या लढाऊ संघटनेचे प्रेरणास्थान आहे. म्हणून ध्येयनिष्ठेने दलित साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकांच्या साहित्य प्रेमाबद्दल नसत्या शका न घेता मराठीचे हे नवे शक्तीकेंद्र प्रत्येकाने समजून घ्यावे. यातच मराठी भाषेचं आणि मानवतेचेही कल्याण आहे.' असे कळकळीचे आवाहन प्रा. केशव मेश्राम यांनी केले.

**व्याख्यान दुसरे : श्री. बाबा मोहोड**
**युवाशक्ती आणि आजची सामाजिक आकांक्षा**

सामाजिक कार्याचा दीर्घकाळ प्रत्यक्ष अनुभव घेतलेले, 'नव निर्माण'चे सपादक, प्रथितयश कवी श्री. बाबा मोहोड यानी आपल्या व्याख्यानात आजच्या सामाजिक स्थितीचा विचारपूर्वक आढावा घेऊन त्यात बदल होणे अत्यावश्यक कसे आहे ते प्रभावीपणे सांगितले. सर्व दूर भ्रष्टाचाराचे साम्राज्य पसरलेले असताना त्याविरुद्ध विद्रोह करण्याचे, तो थोपवून धरण्याचे सामर्थ्य फक्त युवकामध्येच असल्याचे ते म्हणाले. या संदर्भात युवाशक्तीला आवाहन करताना या बाबत जुनी पिढी सर्वप्रकारे भ्रष्टाचाराला आळा घालायला असमर्थ ठरल्याची प्राजळ कबुलीही त्यानी दिली.

**व्याख्यान तिसरे : प्रा. र. वि. रानडे**
**सांस्कृतिक क्रांती**

: लोकशाहीच्या नावावर सरजामशाही पोसणाऱ्यानी वरवर समाजवादाच्या कितीही घोषणा केल्या तरी त्याने समाजवाद येईल ही खुळी आशा आपण बाळगू नये. कम्युनिझमच्या नावाने दचकून अथवा त्याचा फक्त उपहास करून आपण समर्थपणे आपले सशक्त जीवन उभारू शकणार नाही. त्यासाठी सर्व देशात होणाऱ्या नवनवीन प्रयोगांची अभ्यासपूर्वक माहिती करून त्याची इष्टानिष्टता आपण पारखली पाहिजे. आपल्या सामाजिक जीवनाचीही जागरुकपणे दखल घेतली पाहिजे. त्यातील विसंगती समजून घेतल्या पाहिजेत.' असे प्रभावी प्रतिपादन, नागपूर विद्यापीठ कार्यकारिणीचे एक सभासद व नागपूर विद्यापीठातील राज्य शास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. र. वि. रानडे यानी केले.

: केवळ नाटक म्हणून नव्हे तर शिवाजीच्या राज्यरोहण समारंभाचे ३०० वे वर्ष साजरे करताना जे मुजरे, नजराणे हे प्रकार आपण श्रद्धेने वा आवडीने करतो त्यातच त्या जुन्या प्रथा, परंपराबद्दलचे आपल्या मनातील सुप्त आकर्षण व्यक्त होत आहे. इकडे समाजवादी व्यवस्थेचे गोडवे आपण गातो, स्वप्न पाहातो पण प्रत्यक्षात शिक्षण क्षेत्रापासून तर राजकारणात सर्वच ठिकाणी सामंत शाहीचे पाईक म्हणून आपण वावरतो. गरज नसताना, पेट्रोलची टंचाई असतानाही मंत्र्यांच्या स्वागतासाठी विमान तळावर जिल्हाध्यक्षापासून अनेक खालच्या अधिकाऱ्यांपर्यंत मोटारींचे ताफे घेऊन हजर असणे हे कोणत्या समाजवादी व्यवस्थेचे निदर्शक आहे? शिक्षण क्षेत्रात संचालक हे मालक तर शिक्षक हे गुलाम, मुजरे करणारे, सांगितल्याचे हात जोडून पालन करणारे; असे न केल्यास संचालकांच्या रोषास पात्र. ही सारी व्यवस्था, अवस्था पाहिल्यानंतर आपणास सर्वच परिस्थितीचे डोळसपणे निरीक्षण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. या पार्श्वभूमीवर प्रस्थापिताला मानवतावादी दृष्टिकोनातून जनहितासाठी नितान्त आवश्यक म्हणून सतत धक्के देणारी सांस्कृतिक क्रांतीची कल्पना त्यांनी विस्तृतपणे विशद करून सांगितली.

**व्याख्यान चौथे : चित्रकार भाऊ समर्थ**
**चित्रकला आणि मी**

'मोठमोठी माणसे ज्या काळात स्वतःच्या हीनतेचे 'पोटासाठी' या सबबीवर समर्थन करतात त्या काळात सारी प्रलोभने झुगारून, हालअपेष्टा सोसून केवळ कलेवर आणि कलेसाठी जगणारा, कलेवर खऱ्या अर्थाने मरणारा' या शब्दात प्रा. शरद कळणावत यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.

ज्याची चित्रे अनेक देशात विखुरलेली आहेत तो आपल्याच देशात उपेक्षित का राहतो? प्रचलिताचे दास्य न स्वीकारल्यामुळे नको त्याविरुद्ध विद्रोह करण्याच्या वृत्तीमुळे, चित्रकलेची साधना करताना आपल्याला आलेले शिक्षणक्षेत्रातील, सामाजिक, राजकीय वातावरणातील दाहक अनुभव श्री. भाऊ समर्थ यांनी अत्यंत जळजळीत शब्दात बिनदिक्कत मांडले. परंपरेची पर्वा न करता भडक रंगाचे नवनवीन प्रयोग ज्या कौशल्याने ते करतात त्याच कुशलतेने सामाजिक दंभांचे, भडक अनुभव सांगताना त्यांनी श्रोत्यांना थक्क करून सोडले.

कलेचे स्वातंत्र्य गहाण टाकून पोटासाठी अथवा कुठल्याही प्रलोभनाने, श्रेष्ठींची कामगिरी करणारे साहित्यिक अथवा कोणतेही कलावंत यांचा जाहीरपणे त्यांनी धिक्कार केला.

चित्रकलेतील नवनवे प्रयोग, रंगाचे स्वभाव, त्यांचे महत्त्व, जीवनात परिवर्तन करण्याचे त्यांच्या ठिकाणी असणारे सुप्त सामर्थ्य हे विषय हाताळले गेल्यामुळे हे व्याख्यान म्हणजे श्रोत्यांना एक पर्वणीच होती.

**व्याख्यान पाचवे : श्री. ग. माजगावकर**
**गुजराथनंतर**

माणूसचे संपादक हे या व्याख्यान मालेच्या निमित्ताने साऱ्या यवतमाळचेच विलक्षण आकर्षण. माजगावकर म्हणजे कुणीतरी एखादा वयस्क, दणकट, दबंग व्यक्तिमत्त्वाचा माणूस असावा ही



कल्पना ! जवाहरलाल दर्डा यांच्यासारख्या सर्वच क्षेत्रात जबरदस्त प्रभाव असणाऱ्या माणसाच्या विरोधात निर्भयपणे उभा राहणारा हा सपादक पाहायला मिळतो याचाच अनेकाना विशेष आनंद ! तरीपण पाढरपेशी, चष्मा लावणारी व्यक्ती म्हणजेच प्रचड शक्तीशी झुज घ्यायला सिद्ध झालेला ' माणूस 'चा सपादक हे खरे मानायला यवतमाळकराना थोडा वेळ लागलाच.

माजगावकरांनी श्रोत्याना आणखीही एक असाच धक्का दिला. यवतमाळातील श्रोते माजगावकराचे भाषण ऐकायला आले होते हे म्हणण्यापेक्षा ते जवाहरलाल दर्डा याच्या भ्रष्टाचाराची महाराष्ट्रभर पसरलेली कहाणी माजगावकराच्या तोंडून ऐकायला आले होते, हे म्हणणे अधिक वास्तव ठरेल.

पण व्यक्तिनिंदेच्या कोत्या मार्गात पाऊल न ठेवता माजगावकरानी गुजराथच्या आदोलनाची फलश्रुती सुबोधपणे श्रोत्यासमोर मांडली. गुजराथच्या आदोलनाने काय साधले असा प्रश्न करणाऱ्या डाव्या शक्ती आणि सत्ताधीश यांचे तर्क तपशीलवार सागून त्याचे अतिशय प्रभावी खडन माजगावकर यानी केले.

ते म्हणाले ' गुजराथच्या आंदोलनाने सर्वच गोष्टी साध्य झाल्या नसल्या अथवा सत्ताधीशांच्या युक्तिवादाप्रमाणे ते जाऊन त्याचेच कुणीतरी तितकेच भ्रष्टाजारी भाऊ तिथे राज्यकर्ते म्हणून येणार असले तरी, या आदोलनाने एक नवा अकुश तिथे निश्चितपणेच निर्माण केला आहे. आपण काहीही केले, कसेही वागलो तरी आपल्या शिवाय जनतेला पर्याय नाही हा भ्रम, हा उन्माद गुजराथच्या आदोलनाने नाहीसा केला आहे. कोणताही भ्रष्टाचार लोक खपवून घेतात तोवरच तो चालतो. जनतेच्या जबरदस्त प्रतिकारामुळे भ्रष्टाचाराचे सारे सामर्थ्य लुळे, पागळे पडल्याशिवाय रहात नाही !

या आदोलनासबधी डाव्यापक्षांच्या मताची मीमांसा करताना ते म्हणाले, ' कामगाराशिवाय आदोलन नाही, मध्यमवर्ग, पाढरपेशा वर्ग क्राती करू शकत नाही या त्यांच्या कल्पनेला फार मोठा धक्का गुजराथच्या आदोलनाने दिल्यामुळे अजूनही ते यातील सत्य मानण्याच्या मनस्थितीत नाहीत. त्यामुळेच या आदोलनातून काहीही साध्य झाले नाही असा त्याचा निष्कर्ष ते काढू पाहातात. '

माजगावकर पुढे म्हणाले, ' महाराष्ट्रात कधीकाळी हे आदोलन झालेच तर त्यात केवळ गुजराथच्या आदोलनाची नक्कल करून भागण्यासारखे नाही. प्रदेश, परिस्थिती, याप्रमाणे आदोलनाच्या स्वरूपात, साधनात फरक राहील !

भाषण सपल्यानतर अनेक श्रोत्यांनी माजगावकर याना प्रत्यक्ष भेटून त्यानी सुरू केलेल्या भ्रष्टाचारविरोधी मोहिमेची मुक्तकठाने प्रशसा केली. काही श्रोत्यानी मात्र माजगावकर यानी भाषणात दर्डा प्रकरणाचा उल्लेख न केल्याबद्दल अपेक्षा भगातून नापसतीही व्यक्त केली. शेवटी यवतमाळातील अनेक सपादकानीही माजगावकर याची भेट घेतली.

**व्याख्यान सहावे : डॉ. कुमार सप्तर्षी**
**जागतिक युवक आंदोलने**

युवक आंदोलनाचे नेतृत्व करणारे युक्रांदचे कार्यवाह डॉ. कुमार सप्तर्षी याचे व्याख्यान हा सपूर्ण व्याख्यानमालेचा कळस होता. विषयाला ' हिप्पी ते नक्षलवाद ' ही टीप असल्यामुळे की काय पण कोणत्याही व्याख्यानाकडे सहसा न वळणारे अनेक तरुणही या व्याख्यानासाठी गर्दी करून अडीच तास बसून होते. जगातील विभिन्न देशातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आढावा केवळ माहिती देणारा नव्हता, नवी दिशा देणारा होता. सारे श्रोते या व्याख्यानाने भारून गेले होते. फ्रान्स, जपान, इटली. इ. देशातील विद्यार्थ्यांच्या आदोलनातील नवनवीन युक्त्या केवळ मनोरजन करणाऱ्या नव्हत्या. विचारचक्राला वेग देणाऱ्या होत्या. म्हणूनच हे व्याख्यान सपले असे वाटलेच नाही. अनेक विद्यार्थी व्याख्यानानतरही वक्त्याला सोडीत नव्हते.

गुजराथच्या आदोलनाची तपशीलवार माहिती डॉ. कुमार सप्तर्षी यानी सागितली. भ्रष्टाचाराच्या विरोधात सुरू झालेल्या या मोहिमेत विद्यार्थी कसा प्रामाणिकपणे, चिवटपणे झुजतो याचेही चित्र त्यानी रेखाटले. विद्यार्थ्यांनी राजकारणात पडू नये या मताचा परामर्श घेताना ते म्हणाले ' राजकारण ही वाईट गोष्ट तर नाहीच पण आज ती आमच्या जीवनात इतकी सर्वव्यापी झाली आहे की टाळू म्हटले तरी ती टाळता येत नाही. राजकारणाला स्वत चा रग नसल्यामुळे राज्यकर्ते जसे असतील तसे राजकारण दिसणार. महागाई, काळाबाजार ठिकठिकाणी दलितांवर होणारा अन्याय, शिक्षण क्षेत्रात्रील भ्रष्टाचार इ. विरुद्ध विद्यार्थ्यांनी केलेली आदोलने इतर कोणीही केलेल्या आदोलनापेक्षा अधिक प्रभावी आणि सफल का व कशी होतात याचेही त्यानी सुदर विवेचन केले.

जातीयता, सर्व प्रकारचे मतभेद, परपराचा अज्ञानजन्य भ्रममूलक पोकळ अभिमान इ. ला बळी न पडता सघटितपणे ध्येयनिष्ठेने केलेली वाटचाल निश्चितपणे यश देणारी आहे. या सदर्भात मराठवाड्यातील विद्यार्थ्यांच्या आदोलनाची सविस्तर माहिती देऊन त्यानी खेळीमेळीने, अहिंसक पद्धतीने छेडलेल्या आदोलनाचा प्रभाव मनोरजक शैलीने श्रोत्याच्या मनावर ठसविला.

वक्त्याचा सत्कार नाही, परिचयाच्या नावावर नसती प्रशसा नाही, हार घालण्याचा औपचारिक प्रकार नाही, शेवटचे आभार प्रदर्शन नाही हेही या व्याख्यानमालेचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अनावश्यक गोष्टीना काट मारून वैचारिक जागृतीचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात नगर वाचनालयाने दाखविलेली योजकता प्रशसनीय होती.

व्याख्यानमालेच्या सफलतेसाठी तरुण मुले अक्षरश राबत होती. वाचनालयाचे सचिव प्रा. टिकले, सहसचिव अनिल राऊत, सदस्य प्रभाकर माईणकर, रमणीक शहा, श्रीकात पेशवे, बाबू धुमाळ आणि कर्मचारी ओक, मोहन पडघान, बाबा पोटकर, बडू या सर्वांनी अतोनात श्रम घेतले.

व्याख्यानमालेचे सामाजिक महत्त्व पुरेपूर सिद्ध करणारा हा वाग्यज्ञ यवतमाळच्या इतिहासात सस्मरणीय असा होता.


◻

गाणे सपले
तबोरा मस्त लागला आहे
लेको ! स्वर सोडू नका...
एका रसिक श्रोत्याची
यवतमाळमधील एका प्रख्यात शेरोशायरची उत्स्फूर्त प्रतिक्रिया.
या स्वरात
आपलाही सूर मिसळावा म्हणून
श्री. ग. माजगावकर यानी
नगर वाचनालयास ' माणूस 'तर्फे
रुपये एकावन देणगी म्हणून दिले.

— एक प्राध्यापक

# रोझेस इन डिसेंबर

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : चार



**महंमद करीम छगला यांच्या रोझेस इन डिसेंबर या आत्मचरित्राचा धावता परिचय**

जेव्हा मी भारतात परतलो तेव्हा मला एका महत्त्वाच्या प्रश्नाला तोंड द्यायचं होतं. मला माझ्या डोक्यावरती एक छप्पर शोधायचं होतं. मुंबईत माझं असं घरच नव्हतं. अमेरिकेला राजदूत म्हणून जाईपर्यंत मी चीफ जस्टीसेस हौऊसमध्ये रहात होतो व मधल्या काळात या प्रश्नावर मी काही विचारच केला नव्हता. त्यामुळे मी भारतात आल्यावर तावडतोब नेहरूंना एक पत्र लिहिले. त्यात त्यांना मी लिहिले होते की, आजपर्यंत कसलीही विनंती कशाही करता मी त्यांना केली नव्हती पण आता मात्र त्यांनी मुंबई सरकारला माझ्या घराकरता जरा हालचाल करायला सांगावं असा त्याचा मतितार्थ होता. नेहरूंच्या विख्यात स्वभावाला अनुसरून तावडतोब त्यांनी मुंबई सरकारला लिहिले व त्याबद्दल मलाही लिहिले. पुढे चव्हाणांनी मला सांगितले की जेव्हा जेव्हा नेहरू मुंबईत येत तेव्हा तेव्हा ते मला घर मिळालं अथवा नाही याबद्दल आस्थेने चौकशी करीत. मुख्यमंत्र्यांनी तावडतोब मुंबईतल्या सरकारी घरांची यादी मला दिली. त्याप्रमाणे माझ्या मुलीने प्रत्येक घर धुंडाळले पण पागडीशिवाय कोठे काही मिळणारच नव्हते. शेवटी अमरसी नावाच्या उद्योगपतीने माझ्या विषयीच्या आदरापोटी त्यांचे घर द्यायची तयारी दाखविली. पण तो फ्लॅट संरक्षण मंत्रालयाच्या ताब्यात होता. आणि तो मला द्यायची काही संरक्षण मंत्रालयाची तयारी नव्हती.

मी जेव्हा दिल्लीला गेलो तेव्हा नेहरूंनी मला पहिला प्रश्न विचारला तोच मुळी घराबाबत. त्याबाबतीत घडलेला साद्यंत इतिहास मी त्याना कथन केला व संरक्षण मन्त्र्यांच्या असहकाराविषयीही मी सागितल. मला नेहरूनी 'कृष्णमेनन यामा भेटून या' असा सल्ला दिला.

झाल. या महान व्यक्तीला भेटायला मी त्यांच्या घरी गेलो. समोरच्या काळचा डब्यात डिफेन्स सीक्रेट्स घेऊन कृष्णमेनन बसले होते. अत्यत कोरडेपणाने—काहीशा तुसडेपणानेच त्यानी माझे स्वागत केले व मी कशाकरता आलो आहे म्हणून विचारले. मी त्यांना माझ्या 'घर' प्रश्नाची कहाणी कथन केली व शेवटच्या श्री. अमरसी यांच्या घराविषयी सरक्षण मत्रालयाच सहकार्य मला कसं आवश्यक आहे हेही कथन केल. कारण तो फ्लॅट सरक्षण खात्याच्या ताब्यात होता. त्यांनी सागितल की तस करण कठीण आहे, कारण त्यावर लोकसभेत चर्चा वगैरे होईल आणि दुसर म्हणजे समजा मी ते घर सोडून दुसरीकडे गेलो असतो तर संरक्षण खात्याला त्या घराला मुकाव लागल असत. पण मुख्यत्वे करून लोकसभेतल्या चौकशी विषयी ते साशक असल्याच त्यानी सागितलं. मी काहीच बोललो नाही. मला वाटतं कृष्णमेनन 'जीप स्कँडल' बहुधा विसरले असावेत.

मी त्यावेळी नेहरूंकडेच रहात होतो. सकाळी ब्रेकफास्टच्या वेळी त्यांनी मला घराबद्दल विचारलं. मी सारी कथा त्यांना सांगितली. ते ऐकल्यावर नेहरू गभीर झालेले दिसले. त्यानी बहुधा मेनन यांना फोन केला असावा. कारण मी मुंबईला जेव्हा परतलो तेव्हा तो फ्लॅट माझ्या नावावर करून देण्यास सरक्षण मत्रालय तयार होत असं पत्र आल. तेव्हापासून मी त्याच घरात रहात आहे. त्यावेळी दररोज माझी पत्नी अत्यत सचिंतपणे एकच प्रश्न विचारायची 'आपल्याला घर मिळाल का?' दुर्दैव अस की आम्ही त्या घरात गेलो व थोडयाच दिवसात मला एक जबरदस्त धक्का बसला. माझ्या पत्नीच निधन. त्या धक्क्यातून मी अजूनही सावरू शकलो नाही. त्याबद्दल मी पुढे लिहीनच.

मी जेव्हा मुबईत स्थाईक झालो तेव्हा सार्वत्रिक निवडणुकीचे वेध लागले होते. त्यावेळी शांतीलाल शहा माझ्याकडे आले व मुबईतून लोकसभेची निवडणूक लढवावी म्हणून त्यानी मला विनती केली. मला ती एक सुवर्णसधीच वाटली. लहानपणापासून ज्याची मी उत्कटतेने वाट बघत होतो त्याची जणू पूर्तताच होत आहे अस मला त्यावेळी वाटल. मी ताबडतोब त्याला मान्यता दिली. ज्या मुबईत मी लहानाचा मोठा झालो त्या मुंबईच प्रतिनिधित्व करायला मिळतय या विचाराने मी मनोमन सुखावलो.

मला वाटत सार काही व्यवस्थित ठरल होत. पण त्यानतर अचानक ती बातमी आली. सर्वांच्या सल्ल्याला न जुमानता नेहरूंनी मुबईतून श्री. कृष्णमेनन यांनी निवडणूक लढवावी म्हणून आदेश दिला होता शातीलाल यानी मला विचारलं की अपक्ष म्हणून निवडणूक लढवायला तुम्ही तयार आहात काय? मी सागितल की ही नेहरूची इच्छा आहे व त्यांच्या इच्छेविरुद्ध जायची माझी मुळीच तयारी नाही. नेहरूना अशा प्रश्नावरून मी विरोध करणं हे मला मुळातच पटतच नव्हतं.

## तत्त्वांशी तडजोड नाही

त्यानंतर मला कॉंग्रेसने एक महान (!) सधी दिली. औरंगाबादमधून निवडणूक लढवण्याची माझी तयारी आहे काय म्हणून त्यांनी मला विचारलं. त्यानी सांगितल की मुसलमानाची सख्या तिथे *जास्त असल्याकारणाने माझी निवडून यायची* शभर टक्के खात्री आहे. मी भडकलो. आयुष्यभर ज्या तत्त्वावरून मी भाडलो त्याला जणू काळीमाच फासला जात होता. त्यात औरगाबदचा आणि माझा तसा संबंधच काय? मी त्याना कळवल की एकवेळ पार्लमेंटमध्ये गेलो नाहीतरी बेहत्तर पण माझ्या तत्त्वाशी मी कधीच तडजोड स्वीकारणार नाही.

एके दिवशी सध्याकाळी मी विलिंग्डन क्लबमध्ये ब्रिज खेळत बसलो होतो. त्यावेळी मुख्यमंत्र्याचा मला फोन आला. मी त्याना भेटायला गेलो. त्यांनी मला सागितले की त्यांना नुकताच प. नेहरूंचा फोन आला होता व पडीतजीना मी ब्रिटनला राजदूत म्हणून जायला हवे होते. त्यावेळी नुकतीच माझी बायको वारली होती. त्याचप्रमाणे हायकमिशनरच्या ऐशारामी जीवनाची मला मुळीच ओढ नव्हती. त्यात मुख्य म्हणजे भारत सोडायची माझी मुळीच तयारी नव्हती. या सर्वांवर चव्हाणानी मला उत्तर दिले 'या साऱ्याशी मी सहमत आहे. पण पंतप्रधानाची ती इच्छा आहे.' यावर माझाही नाईलाजच झाला. नेहमीप्रमाणे तातडीनेच मला जायच होत.

माझ्या नेमणुकीच इग्लडमध्ये चागलेच स्वागत झाले. लंडन व वॉशिंग्टनमध्ये तसा पुष्कळच फरक आहे लंडन ही केवळ राजधानीच नसून एक मोठ सांस्कृतिक केंद्र आहे. वॉशिंग्टनचे काही तसे नाही.

माझ्या इग्लडमधील हायकमिशनरच्या कारकिर्दीत तीन महत्त्वाच्या घटना घडल्या.

पहिली म्हणजे चिनी आक्रमण, दुसरी म्हणजे राष्ट्रकूल पतप्रधानांची बैठक व तिसरी म्हणजे राष्ट्रपती श्री. राधाकृष्णन याची इग्लड भेट. चिनी आक्रमणाच्या वेळेच्या घटना सर्वांना ठाऊकच आहेत. अत्यत एकोप्याने ब्रिटनने आपल्याला हवी असलेली सर्व मदत देऊ केली. चिनी घडकेला व त्यांच्या विस्तारवादाच्या महत्त्वाकांक्षेला बाध घालू शकेल तर तो फक्त भारत हे त्यांना पटले होते.

## लंडनमध्ये नेहरू

मला आठवते, मला भारतातून सदेश आला, की 'ब्रिटनकडून काही मदत तातडीने पाठवून द्या.' मला ब्रिटीश अधिकाऱ्याना परिस्थिती किती गभीर आहे हेही पटवून द्यायचे होते. त्यांना परिस्थिती कशी होती ते सागून तातडीने जेवढी काही मदत मिळेल तेवढी मिळवायची होती. राष्ट्रकूल मंत्री श्री. डकन सँडीस याना मी फोन केला व त्याची भेट मागितली. त्याच्या सेक्रेटरीने सागितले की, 'शुक्रवार असल्याने वीकएँडला ते कोणालाही भेटू शकणार नाहीत.' मी त्याला सागितले की, ब्रिटीश प्रथा व त्याबाबतचा ब्रिटिशाचा आग्रह मला पूर्णपणे ठाऊक आहे पण घटनाही तशीच गभीर आहे. मी त्यांना भेटलो. ब्रिटनला भारताकरिता जे जे काही करता येणे शक्य होते ते ब्रिटन करील असे आश्वासन त्यानी ताबडतोब दिले व तातडीच्या मदतीकरता त्यानी आर. ए. एफ. ला आदेश दिले. सँडीस याच्याशी बोलणे म्हणजे एक कसरतच असे. अत्यत नि.सदिग्धपणे ते आपली मते माडीत व समोरच्याच स्थान नक्की कोठे आहे हे

दाखवून देत. पण त्याचप्रमाणे दिलेले वचन मात्र ते प्राणपणाने पाळीत. माझे व त्याचे चांगलेच जमत असे. मी संरक्षण फडाकरता तेथे एक कमिटी स्थापन केली. त्याला प्रचड प्रतिसाद मिळाला. त्यावेळीच एक जरा विचित्र घटना घडली. अमेरिका व ब्रिटन भारताला शस्त्रास्त्रे पुरवताहेत हे पाहून पाकिस्तानी हायकमिशनर ले. ज. महमद युसुफ यानी टाईम्समध्ये पत्र लिहिले की या शस्त्रास्त्र मदतीमुळे भारत पाकिस्तानवर चढाई करण्याचा सभव आहे. मी त्यावर लिहिले की, ' दोन देशांच्या राजदूतानी याप्रमाणे उघड उघड पत्रापत्री करणे हे मला योग्य जरी वाटत नसले तरी पाकिस्तानी दूताने जे आरोप भारतावर केले आहेत त्याचा मात्र समाचार घेणे मला आवश्यक वाटते.' मी पुढे लिहिले की, ' आक्रमणाचा जर कोणाचा हेतू असेलच तर तो पाकिस्तानचाच आहे. कारण अनाक्रमणाच्या करारावर सही करायला पाकिस्तान राजी नाही आहे व त्याचाच भारताविरुद्ध सतत विषारी प्रचार चाललेला आहे. कम्युनिस्ट राष्ट्राच्या विरुद्ध झगडण्यास, अस्तित्वात आलेल्या मिलिटरी सघटनाचा पाकिस्तान एक सदस्य आहे व त्याच एका कम्युनिस्ट राष्ट्राने भारतावर आक्रमण केल्यावर ब्रिटन, अमेरिकेने भारताला मदत केली तर त्या विरुद्ध पाकिस्तानने हाकाटी करावी हे आश्चर्य आहे.'

त्यानतर राष्ट्रकुलपतप्रधानाच्या परिषदेकरता नेहरू लडनला आले. अर्थातच नेहरूना अक्षरशः असख्य ठिकाणच्या समारभाची आमत्रणे होती. त्याच्या बरोबरच अनेक देशाच्या पंतप्रधानाना मी भेटलो. जागतिक राजकारणात इतके तणाव असतानासुद्धा इतक्या राष्ट्राचे पतप्रधान या परिषदेत इतक्या शांतपणे मत प्रदर्शन करताना बघून मला थोडेसे आश्चर्यच वाटले. एकदा सध्याकाळी पं. नेहरू माझ्याकडे आले व चहा घेता घेता मुल्कराज आनद याच्या The Hindu Philosophy & Eroticism या पुस्तकाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. नेहरूनी ते चाळले व त्याची स्तुती केली. मी तावडतोड सधी साधली व त्याना सांगितले की, ' पडीतजी, या पुस्तकावर भारतात बदी आहे.' साहाजिकच ते आश्चर्यचकीत झाले व त्यानी त्याचे कारण विचारले व कोणी या सुरेख पुस्तकावर बदी घातली म्हणून विचारले. मी सागितले की 'सी कस्टम्स अॅक्टद्वारे' श्री. मोरारजीनी या पुस्तकावर बदी घातली. त्यांच्या मते ती चित्रे उत्तान आहेत.' तेव्हा मी सागितले की आपल्या इथल्या असख्य देवळावर या प्रकारची चित्रे पहावयास सापडतात व आपल्या सस्कृतीचा तो एक वारसा आहे तेव्हा ही चित्रे व त्यामागील तत्त्वज्ञान ज्या पुस्तकात आहे त्यावर बदी घालणे म्हणजे हास्यास्पदच आहे. अमेरिका व इग्लड या देशामध्ये या पुस्तकाचा प्रचड खप असताना स्वत:च्या देशात श्री. मुल्कराज आनद यांना हे पुस्तक विकता येऊ नये ही खेदाची गोष्ट आहे. नेहरूनी ते स्वत: चौकशी करतील असे मला आश्वासन दिले. मोरारजीच्या स्वभावाचा नमुना म्हणून ही हकीकत मी सागितली.

त्यानतर महत्त्वाच्या तीन व्यक्ती इग्लंडला आल्या. पहिली म्हणजे मोरारजी, दुसरे श्री. टी. टी. कृष्णमाचारी व तिसरे माननीय श्री. राजगोपालाचारी.

मोरारजी जेव्हा इग्लडला आले तेव्हा मला त्याना खान्याकरता बोलवायच होत. पण प्रश्न होता मद्याचा. कारण या खान्याच निमित्त करून इतरही काही प्रमुख ब्रिटिश व्यक्तींना मला जेवणाच आमंत्रण द्यायचं होतं. त्यावेळी मोरारजीना जेव्हा मी विचारलं तेव्हा मोरारजी म्हणाले की, ' इग्लिश व्यक्तीनी मद्य घेतल्यास त्यास माझी हरकत नाही.पण भारतीय लोकानी मात्र मद्य घेऊ नये' अस त्यानी ठामपणे सागितलं. मी म्हणालो की, ' ज्या अर्थी ते माझे अतिथी आहेत त्या अर्थी त्यांच्या इच्छेला मान देणं माझ कर्तव्यच आहे आणि इग्लिश व भारतीय असा भेदभाव काही मी करणार नाही. त्या वेळी मी हॅरॉल्ड विल्सन, ह्यू गेट्स्केला, रॉय जेनकिन्ससारख्या मान्यवर व्यक्तीना जेवायला बोलावले होते. मी त्यांना साधारण सध्याकाळी सात वाजता बोलावले होते. त्या वेळी त्या लोकाना चहा अथवा कॉफी सादर करणे म्हणजे हास्यास्पदच ठरले असते. ठरल्याप्रमाणे ते सर्वजण आले. साहजिकच पेयपाने घेऊन वेटर आला. त्यात व्हिस्की, शेरीसारखी मद्ये व काही सौम्य पेयेही होती. वेटर प्रथम गेट्स्केल यांच्याकडे गेला. गेट्स्केल यांनी मोठचा आश्चर्याने माझ्याकडे बघितले. त्यांना मद्याविषयी मोरारजींची मते ठाऊक होती. गेटस्केल वगैरे काही लोकानी मद्ये घेतली. त्यानतर वेटर मोरारजीकडे गेला. साहजिकच मोरारजीनी कसले तरी सौम्य पेय घेतले. नतर वेटर माझ्याकडे आला. मोरारजी मला वाटते त्याच क्षणाची वाट बघत होते. मी व्हिस्कीचा ग्लास उचलला. मोरारजी माझ्याकडे अगदी डोळे फाडफाडून रागावून बघत होते. इतर लोकांबरोबर निदान एका भारतीयाने तरी विनाशाप्रत जाऊ नये असं त्याना वाटत असावं, अस मला वाटल.

माझ्याकडे आलेल्या अनेक पाहुण्यापैकी अविस्मरणीय म्हणजे राजाजी. ते विशुद्ध शाकाहारी होते. त्यामुळे सकाळच्या ब्रेकफास्टला जेव्हा ते माझ्याबरोबर असायचे त्या वेळी त्यांनी मी खात असलेल्या मार्मलिडबद्दल विचारलं, हे शाकाहारी आहे!' मी उत्तर दिलं. त्यानी तावडतोब विचारलं, कशापासून हे केलं आहे. जेव्हा मी त्यांना सागितल की, हे सत्र्यापासून केलं आहे, तेव्हा तावडतोब त्यानी मार्मलिड तोंडात टाकलं. त्याचप्रमाणे पॉपकॉर्नसची गोष्ट. ते जरी पहिल्यांदाच परदेशी आले असले तरी त्याची स्मरणशक्ती इतकी विलक्षण होती की वाचलेल्या साहित्यामधून लंडनची अनेक ठिकाणे व रस्ते त्याना ठाऊक होते व शहरातून जाताना त्याच्या साहित्यिक जिज्ञासेला अनुसरून ते अनेक (वाचलेल्या) ज्ञात ठिकाणी जायचे. त्याचं जागतिक व भारतीय राजकारणाच ज्ञान हे अत्यत सखोल होत. त्याच्या त्रयस्थ विश्लेषणातून त्यांच द्रष्टचाच ज्ञान सहज दिसून यायच.

त्याच वेळी टी. टी. के सुद्धा इग्लडला आले होते. भारताला जास्तीत जास्त ब्रिटिश आर्थिक मदत मिळवून देण्याकरता ते लडनला आले होते व त्याची आवश्यकता साहजिकच त्यांना ब्रिटिश अधिकाऱ्याना पटवायची होती. मुदडा प्रकरणानतर आम्ही पहिल्यांदाच दोघे भेटत असल्याने नाही म्हटलं तरी आम्हा दोघानाही थोडस विचित्रच वाटल. पण ते मात्र त्या वेळी अत्यत समजदारीने वागले यात काही शकाच नाही. ज्या ज्या मत्र्याकडे अथवा उच्चपदस्थाकडे ते जात तेथे मला येण्याचा ते नेहमीच आग्रह करीत. त्याच्या म्हणण्याप्रमाणे नक्की काय चालल आहे, हे राजदूताला कळणे केव्हाही योग्यच. त्याच्या स्वत:च्या व त्यांच्या

पदाच्या मानापमानाच्या कल्पना फार सवेदनाशील होत्या. त्यामुळे एकदा एक सेक्रेटरी त्यांच्याशी थोडस उडत उडत अपमानास्पद बोलताच तेथल्या तेथे त्यानी त्या सेक्रेटरीला ताणले व नंतर पतप्रधान मॅकमिलन भेटल्यावर पहिली गोष्ट कुठली केली असेल तर त्या सेक्रेटरीचे फाजील वर्तन मॅकमिलन याच्या कानावर घातले. मॅकमिलन यानीही तेवढयाच तत्परतेने सबधित अधिकाऱ्याची चौकशी करू म्हणून आश्वासन दिल.

राष्ट्रपती राधाकृष्णन यांची भेट मात्र अत्यत अविस्मरणीय ठरली. राष्ट्रकुलातल्याच एका राष्ट्राचा प्रमुख इग्लडला येणार होता. त्यामुळे एलिझाबेथ राणीन ठरवलं की, या भेटीकडे अगदी अनौपचारिकरित्या बघायचं. जणू काय आपल्याच कुटुबातली एखादी व्यक्ती भेट देणार आहे. त्यामुळे आम्हाला खास तयारी करावी लागली. त्यात राणीने पण पुष्कळ रस घेतला. कारण या भेटीने पुढील अनेक राष्ट्रप्रमुखाच्या भेटीच्या स्वागतसमारभाचा जणू पायडाच पडणार होता.

इंग्लडची राणी परपरेनुसार नेहमी पाहुण्यांना व्हिक्टोरिआ स्टेशनवरच स्वागताला सामोरी येते. पण राधाकृष्णन तर विमानाने येणार होते. त्यामुळे हीथ्रो विमानतळावर मी व 'प्रिन्सेस रॉयल' यानी त्यांच्या स्वागताला जायच व तेथून त्यांना गाडीने व्हिक्टोरिआ स्टेशनात आणायचे व तेथे त्याच शाही स्वागत होणार असं ठरल. ठरल्याप्रमाणे व्हिक्टोरिआ स्टेशनात प्रिन्स फिलीप व एलिझाबेथ राणी व त्याच्या मागोमाग साऱ्या उच्चपदस्थ व्यक्ती यानी मोठ्या उत्साहाने राष्ट्रपतीच स्वागत केलं. त्यानतर हस्तांदोलन करून दोघानी मिळून बकिंगहॅम पॅलेसला जायचं असं ठरलं होत. पण हस्तादोलन समारभ होताच राष्ट्रपती राधाकृष्णन यानी राणीसाहेबाना तसच सोडल व आजूबाजूला जे अनेक भारतीय नागरिक होते त्यांच्या भेटीसाठी ते गेले व सर्वांच्या स्वागताला सुहास्यवदनाने नमस्ते म्हणून पावती दिली. पण हे काही आधी ठरलेलं नव्हतं. त्यामुळे राणीसाहेबांबरोबरचे सगळेच लोक गोधळले. प्रोटोकलचा मोठा भग झाला होता. पण राधाकृष्णन याना मात्र त्याची मुळीसुद्धा कल्पना नव्हती. मुळातच इग्लीश लोक परपरेचे भोक्ते त्यात खुद्द राणीसाहेब हजर. मग काय ? पण नाही. राधाकृष्णन याच्या विशुद्ध निर्व्याजतेने त्या साऱ्या लोकांना मोहून टाकल. खुद्द राणीसाहेबाकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या नागरिकांना ज्या अकृत्रिमतेने ते भेटायला गेले त्याने सर्वच लोक फार प्रभावित झाले.

सहसा राष्ट्रप्रमुखांची राहायची जागा म्हणजे बकिंगहॅम पॅलेस. पण राणीसाहेबानी राष्ट्रपतीना खास विंडसर कॅसलमध्ये खान्याचे निमत्रण दिले. दुपारी ठरल्याप्रमाणे आम्ही गेलो. राणीसाहेबानी शुभ्र पोशाख परिधान केला होता. त्याना पाहाताच राधाकृष्णन उद्गारले 'हॅलो ! तुम्ही रेसला जाताय तर !' व तेथे हजर असलेल्या त्याच्या मुलाच्या डोक्यावर चापटी मारून त्याना त्यानी थोपटले. राणीला अस सबोधून घेण्याची सवयच नव्हती. एका मनुष्यप्राण्याप्रमाणे संबोधून घ्यायची अथवा समोरचा एक राष्ट्रप्रमुखसुद्धा औपचारिकतेविना बोलू शकतो याची राणीसाहेबाना सवयच नव्हती. पण परत राणीसाहेबाना मोहवून टाकल ते राधाकृष्णन याच्या निखळ, अकृत्रिम व निर्व्याज स्वभावाने.

## प्रकाशकाकडे राष्ट्रपती

जेवणानतर आम्ही ॲस्कॉटला घोडयाच्या शर्यतीला जाणार होतो. राधाकृष्णन यानी मला विचारल की, 'यात त्याची नक्की भूमिका काय असते ?' मी सागितलं की, 'राणीसाहेब घोडयावर जरूर पैसे लावणार. आपल्याला पैसे लावलेच पाहिजेत असं नाही. पण आपल्याला वाटल तर समोरच्या अटेंडटकडे पैसे द्यायचे व कुठल्या घोडयावर लावायचे आहेत ते त्याला सागायचे.' या नुसत्या कल्पनेनेच ते शहारून गेले व ते मला म्हणाले 'आजपर्यंत कुठल्याही प्रकारच्या जुगाराच्या वाटेला मी गेलो नाही आणि आता तर मला त्याचा विचारही करवत नाही.'

प्रिन्स फिलीप याना रेसेस आवडत नसत. त्यामुळे ते पोलो खेळायला गेले. आम्ही रेसेसनतर प्रिन्स फिलीप याच्याकडे गेलो व सर्वजण परत विंडसर कॅसलला आलो. प्रिन्स फिलीप यांनी नतर त्याची लायब्ररी दाखवली. त्यात राधाकृष्णन याची सर्व पुस्तके ओळीने लावली होती. ती बघून राधाकृष्णन खरोखर सुखावले. त्याच्या आदल्या दिवशी ती पुस्तके तेथे असतील की नाही याबद्दल शकाच आहे. पण त्यादिवशी मात्र तेथे त्यांची पुस्तके होती व ती बघून राधाकृष्णन सुखावले यात शकाच नाही. राजनैतिक क्षेत्रात मुद्याची गोष्ट ती हीच.

त्यानंतर त्यानी कॉमनवेल्थ प्रदर्शनाला भेट दिली. त्या प्रदर्शनाचं उद्घाटन राणीसाहेबांनी केल होतं. ते प्रदर्शन बघून येताना एक असाधारण अशी घटना घडली. प्रदर्शन बघून येताना राधाकृष्णन मोटारीतच वळून मला म्हणाले की त्यांना त्यांचे प्रकाशक श्री. ॲलन यांना भेटायच आहे. त्याचे प्रकाशक म्हणजे ॲलन ॲंड अनविन्. मी त्यांना सांगितल की हे काही शेडयूलवर नव्हतं तरीही मी ताबडतोब श्री. ॲलन याना बोलावून घेतो व आपली भेट घडवतो. अथवा त्यानाच पूर्वसूचना देऊन आपण तेथे जाऊ. ते फक्त एकच वाक्य म्हणाले 'नॉन्सेन्स् !' नतर म्हणाले 'मी ॲलनला चागला ओळखतो. चला आपण त्यांच्याकडेच जाऊ'. दुसर काही ऐकायला राष्ट्रपती तयारच नव्हते. त्यामुळे साऱ्याच मोटारीच्या व आऊटरायडर्सच्या जथ्याला तस कळवाव लागल व आम्ही ॲलन अनविन् प्रकाशकाकडे दाखल झालो. मला वाटतं ॲलन याच ऑफीस पहिल्या मजल्यावर होत. चटपट राधाकृष्णन त्याच्या ऑफीसपाशी पोहचले व त्यानी दार वाजवल. दरवाजा उघडून ॲलन बाहेर आले. बाहेर भारताच्या राष्ट्रपतीना पाहून त्याची आश्चर्याने जवळ जवळ बेशुद्ध पडायची वेळ आली. त्यानीही राष्ट्रपतीना विचारल, 'महाराज, आपण मला कळवल का नाही ? मी सर्व व्यवस्था केली असती.' राधाकृष्णन यानी त्याना सांगितल, 'त्या व्यवस्थेच वगैरे जाऊदे, माझ्या पुस्तकाचा खप कसा काय व्यवस्थित आहे ना, ते बघायला मी आलो आहे.' आपल्या पदाच्या प्रतिष्ठेचा खोटा बडेजाव राधाकृष्णन यानी कधीच मिरवला नाही. त्याचच हे एक उदाहरण.

त्यानतरचा लक्षात राहण्यासारखा प्रसग म्हणजे गिलहॉलमधल त्यांच भाषण. लडनचा मेयर साऱ्या राष्ट्रप्रमुखाना याच सभागृहात खाना देतो. त्या वेळी राधाकृष्णन केवळ अस्खलितपणे बोलले. त्याची वाक्गगा अफाट वेगाने धावत होती. ते सपूर्णपणे उत्स्फूर्तपणे

बोलले. पण त्याच्या वक्तृत्वाला जो एक प्रचड ओघ होता त्यात जे त्याचे विचार होते, त्यानी तेथे जमलेल्या सर्वांनाच जणू स्तिमित केल. या आधी सर्व राष्ट्रप्रमुख आधी तयार केलेली भाषण वाचायचे. पण उत्स्फूर्तपणे राधाकृष्णन येथे जे काही बोलले त्याला तोड नव्हती. त्यामुळे एक जिवत भाषण आपण ऐकत आहोत असच सर्वांना वाटल.

मी व त्यांनी ऑक्सफर्डलाही भेट दिली. ऑक्सफर्डला त्यानी रात्री रेल्वे सलूनमध्येच राहायच ठरल होत. पण तेथे गेल्यावर ते म्हणाले की, मी ज्या 'ऑल सोल्स'चा फेलो होतो त्याच्याच वसतीगृहात माझ्या पूर्वीच्या खोलीत रहाण मला आवडेल. हॉटेलचे वॉर्डन होते जॉन स्पॅरो. त्यानीही राधाकृष्णन याच अत्यत प्रेमाने स्वागत केल व एक राष्ट्रप्रमुख म्हणून नव्हे तर एक विचारवत म्हणून अत्यत अनौपचारिकरीत्या त्यानी स्पॅरो यांच्याशी गप्पा मारायला सुरुवात केली. त्या खोलीत असताना ते मला म्हणाले, 'राष्ट्रपतीभवनात भारताचा राष्ट्रपती म्हणून राहाण्यात मला जो आनद मिळतो त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक आनद या खोलीत मी राहाताना मला मिळतो.'

राष्ट्रपतीची इग्लड भेट अत्यत यशस्वी ठरली. त्यांच्या अकृत्रिम निर्व्याजतेने, त्याच्या विद्वत्तेने त्यानी इग्लडमधल्या लोकाना जिंकून घेतल.

एकदा ड्यूक ऑफ एडिनबर्गच्या रेजिमेंटचे कर्नल मला भेटायला आले व त्यानी मला सागितल की, त्याच्या रेजिमेटच चिन्ह म्हणजे व्याघ्रचर्म होत. पण ड्रमर्सच्या अंगावरच चर्म फाटल्याने त्याना नवीन व्याघ्रचर्मे हवी होती व त्याकरता मी त्यांना मिळवून द्यावीत अशी त्यानी विनती केली. त्याप्रमाणे मी भारतातून ती मागवून घेतली व त्याना प्रदान करण्याच्या समारभाला म्हणून साऊथॅम्पटनला गेलो. तो डिसेंबरचा महिना होता व ऑक्सफर्डशायर बोटीवरती तो समारभ आयोजित केला होता. माझ्याकडे जेवढे म्हणून गरम कपडे असतील तेवढे मी घातले होते. पण थडी इतकी जबरदस्त होती की काही केल्या माझ कुडकुडण थाबेना. डेकवर जबरदस्त चावरा वारा होता. खिशातल्या खिशात माझी बोट अगदी गारठून गेली. व्याघ्रचर्म प्रदान करायच तर सोडाच, साधी माझी बोटं काही खिशातून बाहेर निघेनात. माझी अनुकपनीय अवस्था कप्तानाने ओळखली तो मला तावडतोब खाली घेऊन गेला व कडक ब्रँडीचा पेग दिला. मग जरा कुठे माझ्या जिवात जीव आला व मग मी आपले भाषण वगैरे केल.

इग्लिश कोर्टाच्या ज्या चार प्रख्यात सस्था आहेत त्याच्या स्नेहसमेलनालासुद्धा मला खास आमत्रण देण्यात आल होत. 'ग्रेज इन' 'लिकन्सइन', 'मिडल टेपल' व 'इनर टेपल' या त्या चार सस्था. इग्लिश मनुष्य हा परपरेचा अतोनात भोक्ता आहे. ज्या इनर टेंपलचा मी विद्यार्थी होतो तेथे टोस्ट ऑफर करताना साक्षात राजा अथवा राणी आली तरी बसलेले उठत नाहीत. कारण राजा चार्ल्ससुद्धा याच टेपलचा विद्यार्थी होता व तो जेव्हा एकदा आत आला तेव्हा टोस्ट ऑफर करणारा इतका प्याला होता की त्याला धड उभसुद्धा राहता येत नव्हत. त्यामुळे त्याला चार्ल्सने बसूनच राहायला सागितल. तेव्हापासून जी पद्धत पडली आहे ती आजमितीपर्यंत.

तेथला सर्व वकील वर्ग त्यारात्री तेथे जमला होता. त्यातले पुष्कळ लोक जरी वृद्ध होते तरी आयुष्याबद्दल ते काही निराश झाले नव्हते. हौसेमौजेत ते इतराप्रमाणेच पुढे होते. तर त्या समेलनात मी सिगरेट ओढायला लागलो तर एकाने मला हटकले, 'सिनीअर ट्रेझररच्या परवानगीवाचून तुम्हाला सिगारेट ओढता येणार नाही' मी चपापलो. ते बघून सर्वात तरुण वकील उठला व त्याने सिगरेट ओढायला सिनीअर ट्रेझरची परवानगी मागितली. सिनीअर ट्रेझरर म्हणाला, 'आणखी अर्ध्या तासाने तुम्ही ओढू शकता.' व घड्याळाकडे पहात दोनच मिनिटानी म्हणाला, 'अर्धा तास झाला, तुम्ही आता सिगरेट्स ओढू शकता.' हा पण एक परंपरेचा भाग.

त्यारात्री सर्व वकील न्यायाधीश एकमेकांशी मिसळतात. अत्यत मित्रत्वाच्या भावनेने वागतात. कुठल्याही प्रकारची औपचारिकता त्यात नसते. एकेरी नावाने एकमेकाना हाका मारून तो समारभ चालत असतो. आजकाल भारतात न्यायाधीश व वकील वर्ग यांच्यात जणू एक पोलादी पडदाच आहे. जर अशा प्रकारचे समारंभ भारतात आयोजित झाले तर त्यातून वकीलवर्ग व न्यायाधीश याच्यात नक्कीच सुसवाद घडेल.

इग्लडच्या माझ्या वास्तव्यात प्रख्यात लेखक सी. पी. स्नो याच्याशी माझी गाठ-भेट झाली. त्याचप्रमाणे टी. एस. इलीयट याचीही माझी मैत्री झाली. त्याचवेळी ऑब्झरवरचे सपादक डेव्हीड ॲस्टार याचीही माझी गाठभेट होत असे. तसे पाहिले तर ऑब्झरवर अत्यत वजनदार वर्तमानपत्र. तसा त्याचा दृष्टिकोण भारताला अनुकूलच होता. पण नागालँड प्रश्नावर मात्र ते भारताच्या विरुद्ध होते. पिझोला ते कॉलमच्या कॉलम भारताविरुद्ध लिहायला देत. अनेकवेळेला मी त्यांना भारताची बाजू पटवून देण्याचा यत्न करीत असे पण सारे प्रयत्न व्यर्थ जायचे.

लडन सोडायच्या आधी दोनतीन महिने मी नेहरूना पत्र लिहिले, त्यात त्याना मी लिहिले की, 'मला अचानक पत्नीच्या मृत्यूचा धक्का सोसावा लागला. मला त्यावेळी माझ्या कुटुंबाबरोबर रहाणे अत्यावश्यक होते. पण केवळ तुमच्या इच्छेला मान देण्यासाठी मी येथे राहिलो. १ ते २ वर्षे मी येथे रहायचे असे ठरले होते. जवळ जवळ दोन वर्षे होत आली आहेत. कुठल्याही सुसस्कृत देशात कैद्याच्या चांगल्या वागणुकीबद्दल त्याला शिक्षेतून सूट मिळते. मला वाटते आता मला सूट मिळायला काही हरकत नाही. मला नाही वाटत या कृत्रीम अवस्थेत मी फार काळ राहू शकेन. मला उद्विग्नतेने वेढले आहे. आणि त्यामुळे १४ महिन्यानंतर ऑक्टोबरमध्ये भारतात यायचे मी योजले आहे.' त्यानतर नेहरूनी मला लिहिलेल्या पत्रात या दोन कठीण कामगिऱ्या मी पार पाडल्याबद्दल माझे मनापासून कौतुक केले. मला वाटले माझ्या परिश्रमांचे चीज झाले आहे.

[ क्रमशः ]

ग्रामीण भागात विकासाचे विविध प्रकल्प उभारणाऱ्या, विधायक व संघर्षात्मक चळवळी करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक बैठक यंदा दि. १२ व १३ जानेवारी या दिवशी पुणे येथे भरली होती. या बैठकीतून ग्रामायन संस्था साकार झाली. या संस्थेतर्फे म्हैसाळ येथे मे महिन्यात एक शिबिर योजलेले होते. पण रेल्वे संपामुळे हे शिबिर रद्द करावे लागले. तरीपण निवडक कार्यकर्त्यांना पुन्हा एकत्रित येण्याची आवश्यकता भासू लागली. यासाठी पहिल्या बैठकीला उपस्थित राहिलेले व नंतर संबंधात आलेले कार्यकर्ते येत्या २७ व २८ जुलैला पुण्याला परत एकत्रित जमत आहेत.

यानिमित्त ग्रामायनचे अध्यक्ष प्रा. व. द. देशपांडे यांनी तयार केलेले हे टिपण.

बैठकीला न येऊ शकणाऱ्यांनीही आपापले विचार स्वतंत्रपणे ग्रामायनकडे पाठविल्यास त्यांचे स्वागतच होईल.

ग्रामायनचा पत्ता :- द्वारा माणूस साप्ताहिक, पुणे.

# ग्रामायन : एक रूपरेषा

१ : ग्रामायनची स्थापना होऊन सुमारे चार महिने झाले. या कालावधीत फारसे विधायक कार्य झाले नाही. संघटनेच्या काही औपचारिक गोष्टी पार पाडण्यात व कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यात बराच वेळ गेला. परतु या कालावधीतही काही स्पष्टता प्राप्त झाली व भावी कार्यक्रमातील अडीअडचणींची तीव्रतेने जाणीव झाली. हा फायदा काही कमी नव्हे. हा सर्व अनुभव व विचारमथन लक्षात घेऊन आपणापुढे पुढील कार्याविषयी काही सूचना माडीत आहे. सूचना केवळ चर्चेला चालना मिळावी या हेतूनेच माडीत आहे. अतिम निर्णय आपण सर्वांनी मिळून घ्यायचा आहे.

२ : सुरुवातीस ग्रामायनपुढे जी कामे होती त्यात खालील कामे प्रमुख होती.

अ . ग्रामीण भागात सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा एकमेकास परिचय करून देणे व विचाराची देवाण-घेवाण होईल अशी व्यवस्था करणे.

ब : त्याना लागणारे तात्रिक व अन्य प्रकारचे सहाय्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणे.

क : त्याच्या कार्यास यथाशक्ती मदत करणे व त्यांच्या कामात सुसूत्रता आणणे.

ही उद्दिष्टे सहज स्पष्ट झालेली होती. आजही ही उद्दिष्टे डोळ्यापुढे आहेतच. ही कार्ये प्राथमिक स्वरुपाची म्हणजे किमान अशी मानावयास हरकत नाही. ही कार्ये पार पाडण्यास खालील गोष्टींची नितात आवश्यकता आहे.

१ : आपणापैकी प्रत्येकाचे किमान सहकार्य.

२ : काही किमान आर्थिक पाठबळ व शासनव्यवस्था.

३ : काही कार्यकर्त्यांनी आपला किमान वेळ देण्याची तयारी.

या किमान गोष्टींचीही आज पूर्तता होत नाही हे मान्य करावयास हवे. त्या कशा प्राप्त होतील याचा विचार व्हावयास हवा त्यासबधी काही सूचना मी या निवेदनाचे शेवटी करीत आहे दरम्यान इतर उद्दिष्टाचा विचार करू या.

३ : वरील कामांव्यतिरिक्त एक महत्त्वाचे उद्दिष्ट ग्रामायनने स्वीकारले पाहिजे असे मला वाटते. ते असे की, ग्रामीण अर्थ व्यवस्थेच्या विकासाची कल्पना निश्चित करून स्पष्टपणे मांडणे. हे काम सोपे नाही; झटपट होण्यासारखे नाही व एकट्यादुकट्याचेही नाही. निरनिराळ्या प्रकल्पाचा, प्रयोगाचा व आजपर्यंत माडल्या गेलेल्या विचारप्रवाहाचा सखोल अभ्यास करूनच हे साध्य होईल.

यात आता नवीन काय सांगावयाचे आहे अशी अनेकांच्या मनात शका येण्याची शक्यता आहे म्हणून थोडे स्पष्टीकरण जरूर वाटते.

ब्रिटिशाच्या आमदानीत भारताच्या अर्थव्यवस्थेला एक विशिष्ट प्रकारचे वळण दिले गेले. धड मुक्त बाजारयत्रणेचे तत्त्वही मान्य केले नव्हते व आर्थिक नियोजनाचेही तत्त्व मान्य झाले नव्हते. पर कीयाच्या सोयीसाठी वेळोवेळी निर्णय घेण्यात आले, त्यात भारताच्या विकासाचा प्रश्न डोळ्यासमोर नव्हता. परिणामी काही ठराविक शहराचा अफाट विस्तार झाला व इतर भागात आर्थिक परागती झाली. शहरे व खेडी यांच्यात विसंवाद निर्माण झाला. आधुनिक उद्योगधदे व सुखसोयी यानी युक्त अशी मोठी शहरे एका बाजूला व आर्थिकदृष्ट्या पिछेहाट होत असलेली खेडी दुसऱ्या बाजूला शहरे व खेडी याना जोडणारी लहान मोठी शहराची साखळी निर्माण झाली नाही हे या अर्थव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य सांगता येईल. तपशीलात फार न जाता याचा परिणाम म्हणून एक गोष्ट सागावयास हवी, ती ही की ग्रामीण भागाचे शोषण या व्यवस्थेमुळे होत राहिले. म. गाधीना हे शोषण भयावह वाटले व त्यानी

आपल्यापरीने कार्यक्रम आखला. कार्लमार्क्सला कामगारांचे शोषण दिसले तर गांधींना आपल्या परिस्थितीत ग्रामीण भागाचे शोषण अधिक महत्त्वाचे वाटले.

गांधींची ग्रामोद्धाराची कल्पना ग्रामस्वावलंबनाशी निगडित आहे. ती कालबाह्य ठरली असली तरी त्याची प्रमुख प्रेरणा (ग्रामीण भागाचे शोषण थांबविणे) ही मान्य करावयास हरकत नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनतर आर्थिक नियोजनाचे तत्त्व स्वीकारून आपण प्रगतीचा मार्ग आक्रमायला सुरुवात केली. आपल्या पंचवार्षिक योजनात आपण अनेक गोष्टी स्वीकारल्या. त्यात आधुनिक उद्योग-धद्यापासून तो ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यापर्यंत सर्व कल्पनांचा समावेश आहे. कल्पनांचा स्वीकार केला म्हणजे काम झाले असे नव्हे. प्रत्यक्ष अमलबजावणीत कोणत्या गोष्टीवर भर दिला जावा हे पाहिले पाहिजे. तसे पाहता एक गोष्ट स्पष्ट होते की, ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासंबधीचे आपले प्रयत्न अयशस्वी झाले; किंबहुना त्याकडे लक्षच दिले दिले गेले नाही असे म्हणणे अधिक बरोबर होईल. असेही म्हणण्यास हरकत नाही की, ग्रामीण विकासाची कल्पना स्पष्ट करण्याचे देखील आपल्या हातून फारसे प्रयत्न झाले नाहीत. अधूनमधून काही कारखाने मागास प्रदेशात काढावेत, काही सवलती व अनुदाने देऊ करावीत यापेक्षा अधिक विचार व प्रयत्न झाले नाहीत.

ग्रामायनाच्या शिबिरातून, सभातून या विषयाचा सातत्याने पाठपुरावा व्हावा; त्यात प्रत्यक्ष कार्यकर्त्यांचा अनुभव व त्याचे विचार यांचा अभ्यास व्हावा; तात्त्विक पातळीवरील विचार व अनुभव–प्रयोगाचे ज्ञान यांची सागड घातली जावी, हे ग्रामायनचे एक उद्दिष्ट असावे असे वाटते. सातत्याने काही काळ हा प्रयत्न झाल्यास आपला याविषयासबधी काही नवीन विचार देशाला देऊ शकू असा विश्वास वाटतो. आर्थिक नियोजनाच्या विचारात एक मौलिक भर घालण्याची शक्यता त्यामध्ये आहे.

हे झाले अतिम उद्दिष्ट. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी काही टप्पे लक्षात घेऊन वाटचाल करावयास हवी. स्थानिक परिस्थितीचा अभ्यास व निरनिराळ्या प्रयोगाचा अनुभव हा प्रथमतः सकलित व्हावा. प्रथमत. ग्रामीण भागातील विकास प्रकल्पांचा अभ्यास ग्रामायनने हाती घ्यावा. 'सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रयोग' असे या अभ्यासाचे ढोबळ शीर्षक राहील. याचा तपशीलवार विचार करून योजना मांडणे अवघड नाही. अशा अभ्यासाला आर्थिक सहाय्य मिळविणे प्रयत्न केल्यास शक्य आहे. हा अभ्यास यशस्वी होण्यास खालील गोष्टीची आवश्यकता आहे.

१. प्रकल्प कार्यकर्त्यांचे डोळस मार्गदर्शन व सहभाग

३. अभ्यास पार पाडण्यास आपला काही वेळ निश्चित देऊ शकतील अशी तज्ज्ञ मडळी.

३. किमान शासन व्यवस्था आर्थिक पाठबळ.

५.यानतर किंवा हा उपक्रम चालू असतानाच, ग्रामीण भागातील विशिष्ट समस्या व लहानमोठ्या योजना यावर वेळोवेळी पुस्तिका प्रसिद्ध करण्याचे काम आपण करावे. उदाहरणार्थ काही विषय असे.

१. रोजगार हमी योजना व प्रयोग
२. आदिवासी विभागातील चळवळी, विकास योजना
३. भूमिसिंचनव्यवस्थेचे मूल्यमापन, तिचे अर्थशास्त्र
४. सहकारी शेतीचे प्रयोग
५. ग्रामीण भागातील शोषणाचे स्वरूप
६. अस्पृश्यतानिवारणाचे प्रयोग
७. ग्रामदान खेडी
८. ग्रामीण औद्योगिकरण
९. हरित क्रांतीचा प्रसार
१०. लहान शेतकरी, शेतमजूर यासबधीच्या योजना व प्रयोग

असे अनेक विषय सुचवता येतील. या सर्व पुस्तिका केवळ तात्त्विक चर्चेला वाहिलेल्या नसतील तर आपला सर्वांचा अनुभव, आपण केलेले प्रयोग व आपण ग्रामीण भागात उभारलेल्या चळवळी यांचे सार यात यावयास हवे. तरच त्याचा आपापसात, व इतराना उपयोग होईल. अनेक ठिकाणी प्रयोग, चळवळी उभ्या करण्यास त्याचा उपयोग होईल. अशा उद्दिष्टाने या पुस्तिकाची आखणी केलेली असावी.

६. वरीलप्रमाणे लेखनाव्यतिरिक्त एक महत्वाचे कार्य ग्रामायनने स्वीकारावे. ग्रामीण भागातील निरनिराळ्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी काही विशिष्ट अभ्यासक्रम, चर्चासत्रे आयोजित करणे हे ते काम होय. आज ग्रामीण भागात अनेक सस्था व कार्यकर्ते निर्माण होत आहेत. त्याच्या कार्यास निश्चित स्वरूप देण्यासाठी काही किमान प्रयत्न मात्र फारसे होत नाहीत. जनतेसाठी किंवा ग्रामीण-भागाच्या विकासासाठी नेमके काय करावे हे बऱ्याचजणांना उमजत नाही. उदाहरणार्थ, ग्रामपचायती, जिल्हापरिषदा, सहकारीसस्था याचे सभासद, लहानमोठे व्यवसाय चालविणारे लोक, समाजकार्य-

---


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : **छत्तीस रुपये**

सहामाही : **वीस रुपये**

परदेश : (जलमार्ग)

**पंचावन रुपये**

कर्ते, एन. एस. एस. मधील विद्यार्थी इत्यादी अनेक प्रकारच्या लोकाना आपले कार्य अधिक उपयुक्त, परिणामकारक कसे करता येईल याविषयी मार्गदर्शन करणारे अभ्यासक्रम (Courses) तयार करणे व त्याची अमबजावणी यथाशक्ती करणे हेही काम ग्रामायनला स्वीकारता येईल. म्हैसाळ, कोंढाण इत्यादी ठिकाणच्या प्रयोगामध्ये, तेथील सामाजिक आर्थिक समस्या सोडविण्यासाठी, उपयुक्त शैक्षणिक उपक्रमाचा तपशीलवार विचार करणे यासारखी कामेही ग्रामायनच्या कार्यकर्त्यांनी स्वीकारावयास हवीत. त्यासाठी तज्ञाचे सहकार्य मिळवावयास हवे.

७. ही व इतर आपण सुचवाल ती कामे सामुहिकरित्या पार पाडावयाची आहेत हे लक्षात ठेवावयास हवे. प्रत्येक उपक्रमात आपल्याला काय भर टाकता येईल याचा विचार प्रत्येकाने करावयास हवा. यासाठी वर्षाकाठी एक-दोन मेळावे भरविणे आवश्यक वाटते. अशा मेळाव्याची पूर्वतयारी अधिक असेल. त्यात नवीन सभासद मिळविण्याचे प्रयत्नही अधिक असतील. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचेही प्रयत्न होतील.

आजही काही विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांकडे जाऊन, एक-दोन महिने राहून, मौलिक अनुभव घेता येईल काय अशी विचारणा केली आहे. आपणापैकी प्रत्येकाला एक-दोन विद्यार्थी काही काल ठेवून घेता येतील असे वाटते. त्याना तुमच्या कार्यात काही निश्चित स्वरुपाचे काम देता येईल. मोठ्या प्रमाणावर हे शक्य झाल्यास हा एक अभिनव प्रयोग ठरू शकेल.

८. ही सर्व कामे पार पाडणे सोपे नाही हे सांगण्याची गरज नाही. ग्रामायनच्या सघटनेचा त्या दृष्टीकोनातून आता विचार व्हावयास हवा. महत्त्वाकाक्षा व काम करण्याची कुवत (ambition and ability) यांचा समन्वय झाला पाहिजे. एरव्ही अनेक सस्था, मोठमोठ्या कल्पना, भारदस्त-विद्वत्ताप्रचूर भाषेत माडीत जन्मास येतात व शेवटी फारसे कार्य न करता नामशेष होतात. कामांची, उद्दिष्टाची यादी करणे सोपे परंतु ती साध्य करण्यासाठी लागणारी कुवत, जिद्द, मनुष्यबळ निर्माण करणे कठीण. हा आपला सर्वांचाच अनुभव आहे. अर्थात नाऊमेद न होता हे काम करावयाचा एक प्रामाणिक प्रयत्न आपण करूया. त्यासाठी काही सूचना खालील-प्रमाणे--

१. ग्रामायनच्या प्रवर्तक सदस्यांची संख्या वाढवली पाहिजे. आपणापैकी प्रत्येकाने प्रवर्तक सदस्य झाले पाहिजे व वर्षाकाठी रु. १०० अगर अधिक रक्कम ग्रामायनच्या कार्यासाठी दिली पाहिजे.

२. प्रत्येक प्रकल्प कार्यकर्त्याने आपल्या परिसरात किमान पाच प्रवर्तक सदस्य मिळवून देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

३. ग्रामायनच्या कार्यकर्त्यापैकी काहीजणानी तरी एखादा विषय ठरवून, त्याविषयात पारगत होण्याचा निश्चय करावयास हवा. म्हणजे ग्रामायनजवळ निरनिराळ्या विषयातील जाणकार मडळी तयार होऊ शकतील.

४. काही मोठ्या महत्त्वाच्या प्रकल्पावर ग्रामायनच्या काही सभासदानी अधिक लक्ष अधूनमधून दिले पाहिजे. त्यास सहाय्य, प्रसिद्धी इ. देण्यासाठी त्याचा उपयोग होईल. ग्रामीण भागात ज्या अनेक घडामोडी घडत असतात, सरकारी धोरणाची अमलबजावणी होत असते त्याविषयी अचूक सायत माहिती मिळविण्यासाठीही या गावाचा आपणास उपयोग झाला पाहिजे.

५. ग्रामायन एखाद्या योग्य व प्रस्थापित सस्थेशी सलग्न करावे. स्वतःची प्रतिमा स्वतंत्र ठेवूनच असे संबध प्रस्थापित करावेत. त्याचे फायदे आहेत. शासनाची बैठक बळकट होण्यासाठी त्याची मदत होईल. ☐ ☐

---

## दर्डा प्रकरणी समिती !

स. न.

दर्डा प्रकरणीचे सर्व अक मला पाठवावेत. ऑगस्टचे पहिल्या आठवड्यात मुबईत रणागण तर्फे जाहीर सभा (सर्व-पक्षीय) आयोजित करून दर्डा प्रकरणीचा खटला चालविण्यास समिती स्थापन करायची इच्छा आहे. 'रणांगण' तर्फे अल्प-मदत म्हणून शंभर रुपये जुलैच्या पहिल्या आठवड्यात पाठवीत आहे. तुम्ही जर १३-१४ जुलैला मुंबईला आलात तर सविस्तर कार्यक्रम ठरवता येईल.

कागदाने छोटी वृत्तपत्रे मारली जात आहेतच. त्यात आता खटल्याची लाडगतोड सुरू झाली तर निर्भीड, सत्यान्वेषी पत्रकार हे शब्द यापुढे केवळ शब्दकोशातच वाचावयास मिळतील. पत्रकार सघ काही हालचाल करीत आहे की नाही ? निदान या पुढे तरी छोट्या वृत्तपत्रावरील भरले जाणारे खटले चालविण्यास सार्वजनिक पातळीवर एखादी सघटना उभी राहिली पाहिजे. नाही तर छोट्या वृत्त-पत्राचे मुडदे कागद व्यापाऱ्याच्या दरवाज्यात पडून त्यांची थडगी कोर्टाच्या आवारात उभी राहिलेली दिसतील. घटनेत वृत्तपत्र स्वातत्र्य आहेच !

बरेच दिवस दर्डा प्रकरणी तुमच्या खाद्याला खांदा लावून उभे रहावे असे वाटत होते. परतु धीर होत नव्हता. निष्काचन आणि असघटित माणसाचा सताप हा बोडकीच्या तळतळाटा सारखाच वाया जातो. परंतु 'रणांगण' च्या प्रथमवर्धापन दिनानिमित्त वाचकांनी जो प्रतिसाद दिला तो पाहून काही हालचाल करावयास हरकत नाही असे वाटले. असो.

२१-६-७४ — अनिल स. बर्वे
मुबई — सपादक 'रणांगण'

# मराठवाडा आंदोलन : पृष्ठ ९ वरून

सरणीची मंडळी आहेत. अण्णासाहेब गव्हाणे, जैन आदि विरोधी मंडळीही आहेत. कॉंग्रेसचे पवार, देशमुख वगैरेही मंडळी त्यात सामील. तर नांदेडच्या सुधाकर डोईफोडे, प्रा. कुरूंदकर वगैरे मंडळींचाही त्यात समावेश आहे. जनसंघी आहेत, कम्युनिस्टसही आहेत. त्यामुळे मुळातच, या विभिन्न घटकामध्ये नैसर्गिक मतभिन्नता आहे. शिवाय शंकरराव चव्हाणाचा मुख्यमंत्रीपदाचा वाद हाही विवाद्य मुद्दा आहेच या आंदोलन काळात हे मुद्दे पुन:पुन्हा उफाळून आले. विद्यार्थ्यांचे आंदोलन भ्रष्टाचार, लाचलुचपत, काळाबाजार ह्या विषयावर रेंगाळत होते तोपर्यंत ह्या बहुतेक सर्व मंडळींनी आतूनच किल्ल्या फिरवायचे काम केले बहुतेक लोक अलिप्तच राहिले किल्ल्या व्यवस्थित लागून आंदोलनाची गाडी विकासाच्या मार्गावर आली तेव्हा सर्वजण आंदोलनात उतरले. सर्वांनी आपल्या मागण्या पुढे रेटायचा प्रयत्न केला. अचानक मुंबईला बोलावणे आले, त्या सुमारास नांदेडला जविप-नागरिक समन्वय समितीची बैठक व्हायची होती. ही बैठक रद्द करून लोक मुंबईला गेले तेव्हा औरंगाबादेतील मंडळी विथरली. बीड, उस्मानाबादकरांनी मुंबई सभेवर बहिष्कार टाकला, तर नांदेडकरांनी थयथयाट केला. त्यामुळेच, मुंबईनंतरची नांदेडची नागरिक समन्वय समितीची बैठक गाजली. बरेच परस्पर विरोधी आरोप प्रत्यारोप होऊन शेवटी भाई श्रॉफ ह्यांनी परिषदेच्या नेतृत्त्वाचा राजिनामा सादर केला तेव्हा मंडळी शमली श्रॉफ ह्यांचा राजिनामा अर्थातच मागे घेतला गेला. औरंगाबादकरांनी मुंबईत मान्य केलेल्या तोडग्याला असमाधानी का होईना पण संमती मिळाली.

परंतु अशी संमती मिळाली तरी अंतर्विरोध संपले नाहीत. लढ्याने बरेच काही मिळवून दिले आहे असा दावा (मागच्या अंकात सांगितल्याप्रमाणे !) श्रॉफ आदिंनी केला. तर नांदेड, बीड, उस्मानाबादवर अत्यंत अन्याय झाला आहे ही भूमिका इतरांनी धरली. 'शंकरराव चव्हाणाचा जिल्हा म्हणून नांदेडकडे तर खूपच दुर्लक्ष मुद्दाम केले गेले.' असा आरोप नांदेडात अनेकांनी केला. '...आमच्या शंकररावांनी आंदोलन ऐन थराला आल्यावर कच खाल्ली...' असेही श्री. डोईफोडे म्हणाले. '...वसंतरावविरुद्ध लढणे जविपला मान्य नव्हते. म्हणून संधी मिळताच आंदोलन थांबवायचा निर्णय घेतला गेला. पण नांदेडकरांना हे मान्य नव्हते. नांदेडला काय मिळू जात आहे? ब्रॉडगेज नाही, सबसेंटर नाही, मेडिकल कॉलेज नाही, मोठी इंडस्ट्री नाही. अप्पर वैतरणा योजना आम्हाला जास्त महत्त्वाची. पण तिचा उल्लेख नाही. .. अशा ह्या स्वार्थी औरंगाबादी नेतृत्त्वामुळे आंदोलनात फाटाफूट झाली. आंदोलन थंडावले...

हीच साधारण प्रक्रीया मला सर्वत्र आढळली. परभणी वगळता उस्मानाबाद, लातूरला तर पुराच असंतोष होता...

अशा तऱ्हेने, स्वार्थ, वैयक्तिक हेवेदावे, अंतर्गत फाटाफूट ह्यामुळे हे भरघोस यश घेऊन सुरू झालेले आंदोलन, ध्येयहीन, दिशाहीन अवस्थेत फरफटले गेले विद्यार्थी व त्याचे नेते आणि त्याचप्रमाणे जविप व अन्य नेते सारेच त्याला जबाबदार आहेत. आणि अशा गोंधळात आंदोलनाचा शेवट होऊ पहात असता, परभणीच्या विद्यार्थी मेळाव्यात, अचानकपणे पुन्हा विद्यार्थ्यांनी उचल खाल्ली. नेतृत्त्वाला फारशी दाद न देता, परीक्षासंबंधी नवे पवित्रे घेतले गेले. तारीख पुढे ढकला, खटले मागे घ्या, एटीकेटी वाढवून द्या. कुलगुरूंनी कडवे धोरण स्वीकारले. घडवून आणलेला रॅप्रोच उधळतो की काय वाटू लागले. आणि श्रॉफ ह्याचे अनपेक्षित उपोषण सुरू झाले.

ह्या उपोषणाविषयी आपली भूमिका समजावून सांगताना श्री. श्रॉफ म्हणाले, 'परभणीला ह्या मागण्या पुढे आल्या. त्यापूर्वी त्याची कल्पना कुलगुरूंना दिली होती. त्याविषयी सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासनही नाथांनी दिले होते. पण सभेत श्री. नाथांनी ह्या गोष्टीचा उल्लेखच केला नाही. नंतर नाथांनी आपली मूळ भूमिकाच बदलली. १ जूनला कृतिसमितीची बैठक झाली. सर्वानुमते परीक्षा तारीख १७ जुलै मागितली गेली. त्यावेळी मी दोन्ही बाजूंना सांगितले, Be realistic in your approach पण फारसा फायदा झाला नाही. नाथांशी चर्चा करण्यासाठी एक कमिटी ह्या बैठकीत नेमण्यात आली. दि. २ ला एक डेलिगेशन नाथांकडे गेले. पण नाथांची भूमिका बदलली नाही दि. ३ ला सध्याकाळी विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ जायचे होते. पण तिकडे मीटींग चालू असतानाच इकडे प्रेसला नाथांचे स्टेटमेंट आले– परीक्षेच्या १९ मे रोजी आखलेल्या वेळापत्रकात बदल होणार नाही. ह्याचा अर्थ वाटाघाटींना काही अर्थच नव्हता मी स्वत: त्यावेळी नाथांना त्याचे निवेदन थोपवून धरायची व चर्चा करून निर्णय घ्यायची विनंती केली. परंतु माझ्याही पत्राचे उत्तर माझ्याआधी प्रेसला गेले नाथ अॅडामेंट झाले होते. त्याचवेळी नाथांची भूमिका मान्य असल्याची निवेदने दलित विद्यार्थी काढू लागले. त्यामुळे परिस्थिती चिघळू लागली. विद्यार्थी चिडू लागले. ह्यामुळे दृष्टिपथात आलेला रॅप्रोच उधळून जातो की काय असे वाटू लागले तसे घडते तर एकूण प्रकरणाला वेगळेच वळण लागले असते. मुंबईला जे पदरात पाडून घेतले तेही गमवावे लागले असते. हे टाळावे म्हणून ह्या प्रकरणात तडजोड आवश्यक होती. त्यासाठी नाथांवर दडपण आवश्यक होते. अशा परिस्थितीत त्यावेळी उपोषणाशिवाय दुसरा पर्यायच माझ्याजवळ नव्हता. वस्तुत: माझा उपोषणावर विश्वास नाही पण त्यावेळी माझा नाइलाजच होता...'

ह्या उपोषणानंतर दोनच दिवसांनी नाथांनी तडजोड स्वीकारली. असे म्हणतात की स्पेशल सीआयडी रिपोर्ट मुंबईला जाताच, नाथांवर मुंबईवरून प्रेशर आलं मुंबईचे कॉंग्रेसवाले तसे हुशार. आपल्या स्थानाला धोका न पोचवणारे एकवादे आंदोलन कुठे उभे राहिले तर त्याबाबत ते फार रिझनेबल भूमिका घेऊन आंदोलन मिटवून टाकतात...

तर असे हे उपोषणांनी परीक्षेभोवती घोटाळलेले पहिले पर्व संपले. आंदोलन संपले. आंदोलन संपले असे मी तरी म्हणत नाही. कारण पर्व संपले असले असले तरी चीड मेलेली नाही. विद्यार्थी आजही चिडलेला आहेच. बेकारी, महागाई, भ्रष्टाचारही सुरू आहेच कृती समितीच्या चुका विद्यार्थ्यांना बऱ्याच अशी उमगून आल्या आहेत. त्याचे मध्यवर्ती केंद्र औरंगाबादेहून नांदेड ह्या लढाऊ शहरी हालले आहे. नेतृत्त्वही परभणी, नांदेड, आंबेजोगाई परिसरात स्थिरावण्याची शक्यता आहे– मुसा, युकाद दोघांनाही बाजूला सारून. शेतमजूर, रिक्षावाले, कामगार ह्यांच्याशी संपर्क चालू झाले आहेत. राजकीय नेत्यांशी मात्र नाही. त्यामुळे थोडा वेळ लागेलही कदाचित पण अशांत-भकास मराठवाड्यात आंदोलनाचे दुसरे पर्व पुन्हा उभे राहिलेच तर ते कदाचित आजच्यापेक्षाही तीव्र असेल !

–अर्थात तोपर्यंत शासनाला जाग आली आणि शासनानेच काही हालचाल केली तर मात्र सांगता येत नाही.

**स मा प्त**

मध्यंतर

आविष्कारची

# प्रतिमा

पुष्पा भावे

आरती प्रभु लिखित 'प्रतिमा' हे मुक्त-छदात्मक नाटक 'आविष्कार' या सस्थेतर्फे, सुलभा देशपाडे याच्या दिग्दर्शनाने सादर झाले. या नाटकाच्या लेखकाचे नाव चि. त्र्य. खानोलकर नसून 'आरती प्रभु' आहे, हा विशेष नाटचस्वरूप स्पष्ट करणारा आहे. कवी म्हणून खानोलकराचे आरती प्रभु हेच रूप आपल्याला परिचित आहे हे नाटक सपूर्णतः मुक्त छदात्मक आहे. खानोलकराच्या 'एक शून्य बाजीराव' पासूनच त्याच्यातला कवी आणि नाटककार याचा समन्वय कथात्मक मराठी नाटकाला प्रगल्भ काव्यात्म नाटकाकडे नेईल अशी अपेक्षा अनेक प्रेक्षकानी, दिग्दर्शकांनी बाळगली होती. परतु त्याच्या काव्यात्मतेला नाटकाच्या पुरेशा जाणिवेची जोड न मिळाल्यामुळे आजवर त्याच्या नाटकाना रगमचाला नेमके प्रस्तुत असणारे वा रगमच माध्यमाला पुढे नेणारे स्वरूप लाभले नव्हते. ज्याच्याकडून चागल्या काव्यात्म नाटकाची अपेक्षा करता येईल अशा नाटककाराविषयी निराशा पदरी येणे, हा अनुभव नाटचवर्तुळातील बहुतेकाना कष्टप्रद झाला असावा. या पार्श्वभूमीवर आरती प्रभूनी परीकथेच्या रूपात सरळ काव्यात नाटक लिहिले अशी वार्ता ऐकली तेव्हा नव्याने कुतूहल जागृत झाले,

वरवर पाहता प्रौढ नाटकासाठी परीकथात्मक स्वरूप जरी अप्रयोजक वाटले तरी खोलवर विचार करता असे ध्यानात येते की सर्वच मानवी अनुभवाचे मूलाकार परीकथामध्ये व्यक्त झालेले असतात. 'प्रतिमा' या आरती प्रभूच्या नाटकाचा प्रयोग पाहातानाही हे लक्षात आले की ही केवळ राजकन्या आणि राजपुत्र याच्या प्रेमाची कहाणी नाही. जादूच्या साहाय्याने वा वात्सल्यापोटी दुसऱ्याच्या जीवनावर हुकूमत गाजवू पाहणाऱ्या मानवी वृत्तीचीही ही कथा आहे. प्रेमाला प्रतिसाद शोधणाऱ्या मूलभूत मानवी एकाकीपणाचेही हे चित्रण आहे. राजकन्या हिरण्मयी आणि राजपुत्र गभीरदत्त याच्या राज्यामध्ये केवळ समुद्र नाही; या समुद्रकिनाऱ्यावरील एक विचित्र बेट आहे. या बेटावरील प्रत्येकाला मत्र सिद्ध करता येतो. किंबहुना या बेटावरील समाजात ज्याची मत्रशक्ती लुप्त झाली आहे अशा माणसाचा सामुदायिकरीत्या खून होतो. हिरण्मयी आणि गभीरदत्त याचे जग—त्या जगातील रागलोभाचे प्रवाह आणि हिरण्मयीच्या राज्यातील मंत्रशक्तीवर चालणाऱ्या बेटातील रागलोभ यामध्ये एक प्रचड दरी आहे. परतु मत्रशक्ती प्राप्त झाली असली तरी या बेटावर माणसेच राहतात. ही माणसे कोणाही सामान्य माणसाइतकीच प्रेमाच्या प्रतिसादाची भुकेली आहेत—एकाकी आहेत. या एकाकीपणामुळेच नकळत हिरण्मयीच्या प्रेमजीवनात बेटावरील वृद्ध चर्मकार आणि तरुण जास्वदी याच्याही जीवनाचे धागे गुततात. हा चर्मकार मत्रशक्ती प्राप्त असूनही तिच्यापासून दूर राहिला आहे, बेटावरचा असून तत्त्वज्ञाप्रमाणे बेटावरचे जीवन अलिप्तपणे न्याहाळीत आहे. आणि अचानक राजकन्येच्या गोजिरवाण्या पावलाचे दर्शन त्यास घडते. त्या पावलाकडे पाहाता-पाहाता त्याच्या व्यक्तिमत्त्वातील सुप्त वात्सल्य उफाळून येते. घरी जाऊन तो एक प्रतिमा निर्माण करतो. त्या प्रतिमेचे रूप हुबेहूब हिरण्मयीसारखे असले तरी ती चर्मकाराची 'चदन' असते. या आपल्या लेकीला सर्व मानवी व्यवहारापासून तो विलग ठेऊ इच्छितो, म्हणून आयुष्यात प्रथमतः मत्र सिद्ध करून आपल्या झोपडीबाहेर लक्ष्मणरेषा निर्माण करतो.

जास्वदी या चर्मकाराच्या पितृवासल्याची कुचेष्टा करीत आसपास वावरत असते. परतु तिच्या नकळत या प्रतिमेला लाभलेल्या पितृवासल्याचा आणि हिरण्मयीच्या प्रेमाचा तिला हेवा वाटत असतो हिरण्मयीच्या दर्शनार्थ येणाऱ्या राजपुत्राची नजर त्या प्रतिमेवर खिळून रहाते आणि प्रतिमेमागे लपून जास्वदी राजपुत्राचा अनुनय करू लागते. आपले सत्यस्वरूप प्रगट केल्यास राजपुत्र आपला स्वीकार करणार नाही हे माहीत असल्यामुळे ती कपटनाटक रचून राजपुत्राच्या हातून हिरण्मयीची हत्या करवते. हिरण्मयीचा देह निष्प्राण होतो आणि प्रतिमा सजीव होते. परतु कपटासाठी मत्राचा वापर केल्यामुळे जास्वदीची मत्रशक्ती हरवते. निराश, हतबल झालेली जास्वदी आपल्या भयानक मृत्यूची वाचे ऐकत असते. तिच्या प्रेमनिराशेने, ईप्सित प्राप्त झालेले राजपुत्र-राजकन्याही विद्ध होतात. त्या शापित किनाऱ्याकडे पाठ फिरवून समुद्रापार जायला निघतात.

अशा स्वरुपाचे नाटक मुक्तछदात्मक, काव्यबद्ध असण्याला विशेष प्रयोजन आहे. कारण अशा नाटकात घटनात्मकतेच्या पलीकडे जाणे विशेष अगत्याचे असते. काव्यमाध्यमामुळे कथानकाकडून अनुभव मूलाकडे जाणे अर्थपूर्ण होते. पण 'प्रतिमा' च्या सहितारूपाकडे पाहता आरती प्रभूच्या काव्यामधील वेधक चित्रमयता वा आतरिक लय क्वचितच जाणवते. या उलट यमक प्रासाकडे वाजवीपेक्षा जास्त लक्ष पुरवले गेले असल्यामुळे सवादाच्या उच्चारणात वाहत्या लयीपेक्षा खटकेच अधिक जाणवतात.

'प्रतिमा' या नाटकाचे दिग्दर्शन सुलभा देशपाडे यानी केले आहे. सपूर्ण नाटकाचे सकल्पन करताना वा स्वत जास्वदीची भूमिका उभी करताना 'प्रतिमा'तील नाटचाच्या स्वरुपाची जाणीव दिग्दर्शिकेने पुरेशी व्यक्त केलेली नाही. मूलत 'प्रतिमा' हे नाटक दिवाणखान्यातील मराठी नाटकापेक्षा आमूलाग्र वेगळे आहे. मुक्तछदात्मक सवाद आहेत याचाच अर्थ नाटकातील सर्व हालचाली, सवादोच्चार, हाताचा उपयोग वाहत्या रेपात असणे आवश्यक होते. आणि याहीपेक्षा महत्त्वाचे असे की बेटावरील

जीवनातून मानवी समाजाचे आदीरूप रासवट असे प्रगट होणे आवश्यक होते.

सुलभा देशपांडे यानी जी जास्वदी उभी केली ती बरीचशी सामाजिक नाटकातील नायिकेसारखी आहे. खरे म्हणजे सुलभा देशपांडे यानी यापूर्वी दैत्य राजकन्या शर्मिष्ठा (कर्नाडाच्या 'ययाती 'त) उभी केलेली आहे. परतु या नाटकात आपण उच्चारित आहोत त्या शब्दामागील अनुभवाचा रगही त्या ध्यानात घेत नव्हत्या. एखाद्या अनुभवाची भयानकता आणि हुदके-उसासे यातून व्यक्त होणारा रडवेपणा यातील अतर सुलभा देशपांड्यासारख्या जाणत्या नटीला जाणवणे आवश्यक होते. सुलभा देशपांडे याची चालही दोषास्पद होती. प्रत्यक्षात त्या एका पायाला किंचित झटका देत चालतात. परतु चुणीदार घातल्यावर ही चाल अधिकच खटकत होती. आणि या सर्वाला व्यापून उरणारी एक भयावह गोष्ट प्रतिमा पाहाताना ध्यानात आली ती म्हणजे सुलभा देशपांडे स्वतःला विसरू शकत नाहीत. त्या भूमिकेत विरघळून जात नाहीतच; पण अभिनय करताना त्यांच्यातला 'मी' फार डोकावत असतो. त्यामुळे अभिनयाची जागा हळूहळू नाटकीपणाने घेतली आहे. मराठी रगभूमीवर नाटकीपणाविरुद्ध सयत अभिनयाची शैली स्वसामर्थ्याने उभी करण्याचे श्रेय बऱ्याच अशी श्रीराम लागू याच्याकडे जाते. शब्द जाणून समजून उच्चारून त्याला नाट्यातील शब्दाचे मांत्रिक सामर्थ्य देणे या नटाला सहज साधते. काव्य हा या नटाच्या विशेष प्रेमाचा विषय आहे. त्यामुळे डॉक्टराच्या चर्मकाराच्या भूमिकेविषयी विशेष अपेक्षा होत्या. परतु या अपेक्षा 'प्रतिमा 'च्या प्रयोगात सफल झाल्या नाहीत. एक तर नाट्यसहितेतच चर्मकाराचे पात्र नाटककाराच्या तत्त्वज्ञानाची बोलकी बाहुली म्हणून वापरलेले आहे. आणि दिग्दर्शिकेने मुक्तछदात्मक सवादोच्चारणाची काही विशेष पद्धती योजली नसल्यामुळे चर्मकाराचे सवादही, काही जागा वगळता सपाट झाले. लागूनी अनेक नाटकात वृद्धाच्या भूमिका केलेल्या असल्या तरी प्रत्येक नाटकातील वृद्धाला त्यानी आपल्या अभिनयाने स्वतत्र व्यक्तीमत्त्व दिलेले होते. परतु प्रतिमातील चर्मकाराची भूमिका मात्र असे व्यक्तीमत्त्व घेऊन उभी राहिली नाही. वाचिक अभिनयाला महत्त्व देत असूनही लागू आपले सपूर्ण शरीर अभिनयाला देतात. परतु या नाटकात नजरेशिवाय इतर कोणत्याही घटकाचा ते वापर करीत नाहीत. चदनबरोबरच्या प्रवेशात ही नजर त्यानी फार परिणामकारकतेने योजली. प्रतिमा नाटकातील राजपुत्र व राजकन्या म्हणजेच अमोल पालेकर आणि दीपा-श्रीराम याची निवड अनेक प्रेक्षकाना रुचली नाही. राजपुत्र, राजकन्या याचे वय, रूप कसे असावे याचे काही सकेत आपल्या मनात रूढ झालेले असतात. प्रयोगाचे परीक्षण करताना झालेली निवड गृहीत धरूनच आपण पुढे विचार करतो. 'प्रतिमा' नाटकातील राजपुत्राच्या भूमिकेला फारसे रगरूप नाही. अमोल पालेकरानी त्यातील साकेतिक विव्हल नायक आणि स्वतःला प्रेम लाभल्यावर जास्वदीसाठी विद्ध होणारा सहृदय या दोन्ही अगानी भूमिका उभी केली. प्रयोग शैलीदार आहे असे मान्य केले तरी पालेकराचे पुढे झुकून पोक काढून उभे राहणे चालणे दोषास्पद होते. या सपूर्ण प्रयोगात अभिनयाच्या दृष्टीने लक्षात राहिल्या दीपा-श्रीराम! वस्तुतः राजकन्येची साकेतिक प्रतिमा लक्षात घेता वा आरती प्रभूच्या काव्यनाटकातील तिच्याविषयीचे उल्लेख लक्षात घेता तुलनेने दीपा-श्रीराम याचा चेहरा नैसर्गिकता जड आहे. परतु त्याच्या समरसतेची, अभिनयाची किमया अशी की हा नैसर्गिक अडसर त्यानी दूर केला. गेली काही वर्षे त्याच्या भूमिका पाहाणाऱ्या रसिकाच्या हेही लक्षात आले असेल की आपल्या शब्दोच्चारणातील अनेक दोष त्यानी परिश्रमपूर्वक दूर केले आहेत

'प्रतिमा' नाटकाचा प्रयोग छबिलदास विद्यालयाच्या सभागृहात झाला. या सभागृहाचे क्षेत्रफळ लक्षात घेता शातारास पवार यानी केलेल्या नेपथ्यातील रगांचा वापर अतिरिक्त वाटला. पवाराच्या रेषा आणि कल्पकतेविषयी आदर असूनही असे वाटले की समुद्राचे वातावरण, पोशाखाचे राखी रग लक्षात घेता नेपथ्याचे रग अप्रोजक वाटत होते. मात्र शुष्क फांद्या आणि दोऱ्याच्या सहाय्याने उभी केलेली प्रतीमा प्रयोगशैलीस अनुरूप व सुदर होती. या प्रयोगास भास्कर चदावरकर यांचे पार्श्वसगीत व शशाक लालचद याचे ध्वनीमुद्रण लाभले आहे. परतु दिग्दर्शिकेच्या मनात आपल्याला नाटक काय व कसे प्रक्षेपित करायचे आहे याविषयी ठाम भूमिका नसल्यामुळे सर्व घटकाचा मेळ जुळून येत नाही. सगीत स्वतःसिद्ध चांगले मधुर असले म्हणजे ते चागले पार्श्वसगीत होत नाही. त्याच्या नाट्यानुभवाशी यथोचित समन्वय असावा लागतो. कोणाची तरी मत्रशक्ती नष्ट झाल्यावर झुड त्या व्यक्तीचा बळी घेत आहे हे ज्या सगीतातून सूचित होते ते भयावह, आदिस्वरूपी असणे अपरिहार्य होते. पण प्रस्तुत प्रयोगातील त्या प्रसगीचे सगीत काहीच सांगू शकत नाही. उत्तरा केळकर यांचे पार्श्वगायनही मनाचा वेध घेणारे– राजकन्येच्या प्रेमानुभवाची ओढ सागणारे हवे. या गायिकेच्या आवाजाचा हा प्रत्यय 'हयवदन 'मध्ये आपल्याला आलेला आहे. परतु प्रस्तुत प्रयोगात तिचे गायन परिणाम साधू शकत नाही. वस्तुत 'घाशीराम कोतवाल 'चे सगीत देणाऱ्या चदावरकराची वाद्याचा स्वभाव जाणण्याची कुवत आपल्याला माहीत आहे. म्हणूनच 'प्रतिमा 'च्या पार्श्वसगीताचे नाट्यानुभवाशी फटकून वागणे आश्चर्यकारक वाटते. शशांक लालचद याचे ध्वनीमुद्रण हा आज त्या क्षेत्रातला शेवटचा शब्द आहे. पण 'प्रतिमा'च्या पार्श्वसगीतात याही अगाने दोष राहिले आहेत.

निकटवर्ती रगमचाच्या स्वरूपाचा हा प्रयोग त्या रगमचाचे तर्कशास्त्र सपूर्णतः वापरीत नव्हता. परीकथेच्या स्वरूपाचे कथानक असूनही वेषभूषा पौराणिक न करण्याचा वा प्रतिकृतीवादी पुतळा न वापरण्याचा निर्णय योग्य होता. जे पोशाख वापरले त्याच्या रेषा नाट्यकृतीने स्वीकारल्या नव्हत्या. उदा. राजकन्या चुणीदार घालते तरी तिचा पदर जास्वदीच्या हाती येतो हे मूकाभिनयाने प्रस्थापित होते हेही योग्यच आहे. परतु चर्मकार जोडे 'माईम 'च्या आधारे शिवणार मग पायरीखाली घातलेला मत्र लाल चमकत्या रेषेने का दाखवायचा? (हे फारच हिंदी चित्रपटासारखे झाले) दिग्दर्शिकेचा एक निर्णय नाही असे म्हटले त्याची अशी एक ना अनेक उदाहरणे देता देता येतील.

'आविष्कार' या संस्थेने छबिलदास विद्यालयाचे सभागृह नोव्हेंबरपर्यंत मिळविले आहे. परतु या व्यावहारिक सोयीच्या उपलब्धीवर सतुष्ट राहून प्रायोगिक रगमचाची चळवळ पुढे जाणार नाही. निकटवर्ती रगमच ही केवळ स्वस्त सोय नसून नाट्यप्रयोगाची स्वतत्र शैली आहे त्या शैलीनुसार सहिताची निवड, प्रयोगाची व अभिनयाची शैली सकल्पावी लागेल. या सभागृहात केवळ नाट्यप्रयोगच करता येतील असे नाही तर उत्स्फूर्त नाट्यीकरणाचे, कथावाचनाचे, नाट्यवाचनाचे, काव्यवाचनाचे कार्यक्रम करता येतील. हे कार्यक्रम केवळ तारखा भरण्यासाठी नाहीत तर दिग्दर्शक, नट, नाटककार प्रेक्षक याच्या नाट्यशिक्षणासाठी करता येतील. 'आविष्कार' या सस्थेने एक मुक्तछदात्मक नाटक सादर करून प्रारभ केला आहे. इतर सस्था या कार्यक्रमाला हातभार लावतील अशी आशा आहे. □ □

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. १३ जुलै ७४ ते १९ जुलै ७४**

## राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचे मंथन

केंद्रीय शेतीमंत्री फक्रुद्दीन अली हे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून राष्ट्रपतीपदासाठी जाहीर झाले आहेत. तेच खऱ्या अर्थाने हा आठवडा गाजवणार आहेत. काँग्रेसकडून त्यांचे समर्थन व विरोधकाकडून त्यांचं चारित्र्यहनन असा प्रकार होईल विरोधी पक्ष उदासीन होतील. यावेळी विरोधी पक्षात लाथाळी सुरू होईल 'सात पक्षाच्या मण्याची माळ' तुटण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र मंत्रीमंडळातील एखाद्या मुस्लीम मंत्र्याला इंदिरा गांधींचा आशीर्वाद मिळेल.

### मेष : परदेश प्रवास

भाग्यस्थ चंद्राने आठवड्याची सुरुवात होत आहे. रवी तिसरा उत्तम आहे तर मंगळ चौथा एवढासा ठीक नाही. शनिवार ते बुधवार सर्व प्रकारची कामे उरकून घ्या. शुक्रवारी मात्र कोणताच आर्थिक व्यवहार करू नये या आठवड्यात आपणास परदेश प्रवासाचा योग आहे. आपली ही बऱ्याच दिवसाची इच्छा पुरी होईल नोकरी धंद्याची परिस्थिती एकंदरीत बरी राहील. नवे वाहन घेतले असल्यास त्याचा वापर फारसा या आठवड्यात करू नये. कापड व्यापारात थोडा तोटा होईल. इंजिनिअरिंग उद्योगाचे शेअर घेतल्यास बराच फायदा होईल. तब्येत मात्र कुरमुरीत राहील. थंडीला जपावे. **महिलांस :** नोकरीत त्रासदायक कामावरून सुखाच्या जागी बदली होईल. पैसा हाती खेळेल.

### वृषभ : व्यवसायात बदल

आठवड्याचे पहिले चार दिवस तुम्हाला चंद्र अनुकूल आहे. रवी दुसरा आहे तर मंगळ तिसरा आहे. कौटुंबिक जीवनात थोडीफार काळजी घेणे आवश्यक आहे. मुलगा मोठा सज्ञान असेल तर त्याला शक्यतो चुकीबद्दल बोलू नका. घरात शांत व गोडीगुलाबीचे वातावरण कायम ठेवण्यास मदत करा. काही मनाविरुद्ध घडले तरी संयम फायदेशीर ठरेल नोकरी असो की इतर कोणताही स्वतंत्र धंदा असो त्यात अनपेक्षीत बदल होण्याची शक्यता आहे. नोकरीच्या दृष्टीने दुसरी एखादी चांगली नोकरीची संधी मिळण्याची शक्यता आहे कलावंत, आकाशवाणी कलाकार व गायिका यांना हा आठवडा अतिशय अनुकूल आहे गरजेपुरता पैसा मिळेल. **महिलांस :** नोकरी सोडण्याची इच्छा पुरी होईल. संसारात गोडवा.

### मिथून : इच्छापूर्ती

हा आठवडा आपणास मागल्या आठवड्यापेक्षा अधिक प्रगतीचा जाईल चंद्राचे भ्रमण आठ, नऊ व दहा या स्थानातून होत असून मंगळ दुसरा आहे. अनेक नव्या योजना मनात घोळू लागतील. त्याला प्रतिसाददेखील मिळेल. प्रामुख्याने व्यापार अगर फिरती एजन्सी यावाबतीत मनातील इच्छा आकांक्षा मूर्त रूप धारण करतील. सोमवारनंतर पैशाचे व्यवहार पुरे होतील. कर्जाची व्यवस्था होईल. अडून राहिलेल्या कामाना वेग येईल. नोकरीत प्रगतीला जरी वाव नसला तरी त्रास नाही. **महिलांस :** लघुउद्योगाचे, घरगुती उद्योगाचे स्वप्न साकार होईल. पैसा मिळेल.

### कर्क : नवी संधी

अजून साडेसाती आहे. पण या आठवड्याअखेरीस चंद्राचे उत्तम सहाय्य तुम्हाला मिळणार आहे. मंगळ सध्याच अनुकूल आहे. मिलिटरी प्रमुख, पोलीस प्रमुख, रासायनिक कारखान्याचे व्यवस्थापक प्रमुख, सौंदर्यप्रसाधनाचे कारखानदार व प्रतिनिधी यांच्या उर्जितावस्थेचा हा आठवडा आहे व्यापाऱ्याना अमाप नफा व पैसा मिळेल. लेखकाना त्यांच्या पुस्तकसंबधात धन्यवाद व वाचकांकडून उत्तम प्रतिसाद मिळेल. नवी संधी मिळेल. **महिलांस :** मनोकामना पुऱ्या करणारा हा आठवडा आहे नोकरीधंद्यात यश.

### सिंह : संतापू नका

या आठवड्यात तुम्हाला मंगळ बरा नाही. पण चंद्र व रवी छान आहेत. हे दोन ग्रह अनेक क्षेत्रात तुमच्या कर्तबगारीबद्दल अपेक्षा निर्माण करतील. तुमच्यात आत्मविश्वास निर्माण होईल. आपल्याला काही झेपेल की नाही, जबाबदारी स्वीकारावी की नाही अशा शंका मनात येऊ देऊ नका. तुमच्या संतापी स्वभावाला या वेळी आवर घाला. संतापाने कार्यनाश होतो हे लक्षात ठेवा. या आठवड्यात पैसा गरजेपुरता मिळेल. खर्च कमी करा. नोकरीत कामाचे चीज होईल **महिलांस :** जवळची तीर्थयात्रा घडेल. नोकरी नकोशी वाटेल.

### कन्या : विरक्तीचा विचार

बौद्धिक, सामाजिक व राजकीय कार्यांच्या दृष्टीने हा आठवडा प्रगतीचा आहे. अनेक दिवस उराशी बाळगलेली स्वप्ने सफलतेच्या दृष्टीपथात येऊ लागतील अनेक लोकाचे सहकार्य मिळविण्यात यशस्वी व्हाल. पण तब्येतीची कुरकूर मात्र चालूच राहील. रोज काही ना काही तक्रारी चालू रहातील. नोकरीत कामाचा त्रास नाही. पण वातावरण फारसे अनुकूल रहाणार नाही. हाती पैसा असून देखील समाधान मिळणे कठीण. विरक्तीचा विचार मनात घर करील.

**महिलांस** : सयमाने वागून अनेकाचे सहकार्य मिळवा.

## तूळ : कलेला प्रोत्साहन मिळेल.

तुम्हाला कलावत वनायच ना ? पडद्यावर-रगभूमिवर चमकायचे ना ? तर मग त्या-साठी हा आठवडा अत्यत अनुकूल आहे. आतरराष्ट्रीय कीर्तीच्या एखाद्या कलावताशी तुमचा अचानक सवध येईल. रविवार ते वुधवार या दिवसाची प्रामुख्याने नोद घ्या. तुमच्या अनेक दिवसाच्या अपेक्षा पूर्ण होणार आहेत. सर्वसामान्यदृष्ट्या हा सप्ताह अनुकूल आहे. नोकरीत त्रास नाही. तहकूब राहिलेली पगाराची रक्कम मिळेल बेकाराच्या मागची वणवण व पायपीट सपेल **महिलांस** : प्रसिद्धीचा योग आहे. लेखिका बनाल.

## वृश्चिक : नोकरीत बढती

राशीस्वामी मगळाची अनुकूलता म्हणजे त्रिभुवनातील सामर्थ्याचा साक्षात्कारच होय. कारण मगळ हा सत्तेचा कारक ग्रह नोकरीत तुमची वरिष्ठांना आठवण होऊन एखाद्या महत्त्वपूर्ण योजनेवर तुमची नेमणूक होईल. राजकारणात वावरत असलेल्या व्यक्तीना परदेशी जाणाऱ्या शिष्टमंडळाच्या नेतृत्त्वाची सधी मिळेल. शेतमाल, किराणा माल, सोने, चादी, पितळ, रेशीम याच्या व्यापाऱ्याचे उखळ पाढरे होईल. शेतकरी वर्गाला उत्साह येईल **महिलांस** : नोकरी मिळून वरिष्ठ जागी नेमणूक होईल.

## धनू : थोडी सुधारणा

हा आठवडाभर तरी तुम्हाला मगळाची कृपा लाभणार नाही. अजूनही त्याचे सहकार्य नाही. त्यामुळे अजून थोडे दिवस कळ सोसा. तडजोड वृत्ती, माघारीची तयारी व सयम या गुणामुळे तुमच्या अवतीभोवती दाटलेल्या अडचणीत थोडी सुधारणा होईल. मनाला देखील थोडा उत्साह वाटेल. नवी नोकरी पहाणे किंवा चालू मालकाच्या मनात कोण ताही विकल्प निर्माण होईल असे काही करू नका. बेकारांना मात्र आशादायक काळ. दुय्यम धद्याचे पुनरुज्जीवन अवश्य करा. पैशाची स्थिती सुधारेल. **महिलांस** नोकरीतील त्रास सपेल. मगल कार्यास मोठेपण लाभेल.

## मकर : कौशल्याने वागावे

आठवड्याची सुरुवात शानदार होईल एखादे ' गोड ' पत्र येईल, नोकरीत बढतीची बातमी कळेल. लॉटरीत थोडाफार लाभ होईल. नवा सूट घेण्याची इच्छा पुरी होईल. लेखनात पहिली वहिली प्रसिद्धी मिळेल. तरुणाना ' प्रेम ' कळावे असा साक्षात्कार होईल अशा रीतीने या आठवड्याची सुरुवात होईल. रविवार, मगळवार व शुक्रवार या दिवशी आयुष्यातील आगामी घटना दर्शवणारी स्वप्ने पडतील. कर्तृत्त्वाला नोकरीत सधी मिळेल. पैशाची कामे सहज होतील. **महिलांस** : पतिराजाच्या कलाने वागा. जीवनात आनद मिळेल.

## कुंभ : महत्त्वाचा आठवडा

पहिले दोन-तीन दिवस महत्त्वाची कामे शक्यतो पुढे ढकला. उसना पैसा देऊ नका व कर्ज काढू नका. ज्याच्या हाती प्रत्यक्ष पैशाचे काम आहे त्यानी शनिवार ते सोमवार या दिवशी फार काळजी घ्यावी. एवढे सोडल्यास या आठवड्यात काही महत्त्वाच्या घटना घडतील. राजकीय नेत्याना सत्ता मिळेल. लोकप्रियता मिळेल. राजकारणात नव्याने प्रवेश मिळेल सशोधकाना आर्थिक सहाय्य मिळेल. सार्वजनिक कार्यात काम करणाऱ्याना सत्काराची सधी येईल. रासायनिक खताच्या कारखान्यातील नोकराना पगारवाढ मिळेल. आर्थिकदृष्टचा आठवडा छान आहे. **महिलांस** : कुमारिकाचे विवाह चटकन जमून येतील

## मीन : नोकरी मिळेल

तुम्ही भाविक आहात. चिंतन मननाची तुम्हाला भारी आवड आहे तुम्ही रोज़ आपल्या इच्छित देवतेची उपासना करता. पण असे असूनदेखील अजून काही मनासारखे घडत नाही. सुखस्थान शनीने दूषीत करून ठेवले आहे. पाऊल उचलले की अडथळा असाच जणू प्रकार आहे. पण मला सागायला आनद वाटतो की हा आठवडा तुमचे मन सुखवणारा आहे. इंजिनियरिंग, शेती, वाणिज्य, कायदा व आर्किटेक्ट याचे ज्ञान आत्मसात केलेल्या या राशीच्या तरुणाना नोकरी वा धदा उपलब्ध होईल. भावी जीवनातील वाटचाल कशी होईल याचा पाया यावेळी घातला जाईल चालू नोकरीत इच्छापूर्ती होईल. **महिलांस** : माहेरी जाण्याची सधी येईल. कुटुबसुख. □ □


फुकट फुकट फुकट

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पाढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॅकेट औषध फुकट मागवून फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**



**शनवारवाड्यातील शमादान**

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## ‘ लूक्स ’ची स्टाईल करणारी ‘ कॉलगर्ल ’

# जाहिरा



जाहिरा – एक ‘ लूक ’

‘ आलिंगन ’च्या, रिट्झ् हॉटेलात झालेल्या पार्टीत जाहिरा आली त्या वेळचा प्रसंग– अंग्रेजी फिल्मी अखबारवाल्यामध्ये अँग्री यंग अखबारवाला अशोक रावकवी, एका कोचावर व्हिस्कीचे घोट घेत बसला होता. आदल्या दिवशीच त्याने जाहिराची मुलाखत आपल्या स्तंभात छापली होती. जाहिरा सिरिअसली त्याच्यासमोर उभी राह्यली नि एक विलक्षण छद्मी ‘ लूक ’ दिला. त्या ‘ लूक ’मुळे नर्व्हसली हसणाऱ्या अशोकचे ‘ पिणे ’ आपसुक बंद झाले होते. मी त्या ‘ लूक ’कडे विलक्षण चमकून पहात होतो. मी सिनेमातल्या एवढ्या अदाकारा पाह्यल्या आहेत, पण ‘ लूक ’ देणे हा जो प्रकार होता तो मी फक्त जाहिरा या नटीतच पाह्यला होता.

‘ लूक ’ देऊन अभिनय करणाऱ्या अभिनेत्री आहेत. ‘ आविष्कार ’ या चित्रपटामध्ये



जाहिराची विनोद मेहेराच्या डोळ्यातले कुसळ काढण्याची धडपड. तिच्याच ' नीलिमा ' या चित्रातील दृश्य.

शर्मिलाचे काम पहा, म्हणजे ' लूक ' देऊन अभिनय कसा करता येतो हे लक्षात येते. पण, ' लूक 'ची स्टाईल करणे ही गोष्ट अदाकाराला फारशी शोभा देत नाही. पूर्वीच्या खुबसुरत अदाकारा ' लूक्स 'च्या स्टाईल्स करीत असत. ' जसबाती ' भूमिका करायची असली म्हणजे ' आंखे ' झुकी झुकी करावीत, ' प्यार 'चा मूड दाखवायचा असला म्हणजे कोठेतरी अस्मानाकडे डोळे लावायचे. वगैरे अदाकारांच्या एक एक स्टाईल्स असत. त्यातली जाहिराची स्टाईल नाही. पार्टीसारख्या अनौपचारिक ठिकाणी, जाहिरा ज्याप्रमाणे ' लूक ' देते त्याप्रमाणेच ती कॅमेऱ्यासमोरही ' लूक ' देते. तो तिच्या व्यक्तित्वामध्ये ' ग्रेस ' निर्माण करण्याचा एक भाग असावा; ती एक ' पोझ ' आहे. तिच्या चेहऱ्याभोवती उडणाऱ्या बटा आणि तिने दिलेला लूक यामुळे आपण अत्यंत व्यवस्थित पेश होतो अशी तिच्या मनाची खात्री पटली आहे.

' जाहिरा ' अलीकडे अनेक चित्रपटामधून आली. तिची साधारण चाललेली चित्रे म्हणजे ' अंजान राहें ' आणि ' दि कॉलगर्ल ' त्यापूर्वी ' अनोखा दान ', ' आक्रांत ', ' गॅंबलर ' आणि ' आलिंगन ' या चित्रामधून ती पेश झाली होती. गॅंबलर हे तिचे पहिले चित्र. त्या चित्रात तिने ज्यूली नावाच्या ' वेट्रेस 'चे काम केले होते. ते आता कुणालाही आठवत नाही. त्या चित्रात एरवी शत्रुघ्न सिन्हाची डायलॉगबाजी आणि सचिन देव बर्मन यांची फर्मास गाणी याखेरीज काहीच नव्हते. त्या पिक्चरबरोबर जाहिराला आपण विसरूनच गेलो होतो. अचानक एक दिवस ' जाहिरा या पिक्चरमध्ये येते आहे '—त्या ' पिक्चरमध्ये येते आहे ' असे कानावर ऐकू येऊ लागले. ' आक्रांत 'चे गिरीश वैद्य, ' क्षितिज 'चे प्रेमकपूर, अशा नव्या सिनेमावाल्यांची ती

आवडती हिरॉइन असावी असे वाटू लागले. तिच्यामध्ये त्यानी काय पाहिले कुणास ठाऊक ? तिची ज्यूली इतकी फालतू होती की, तिचे नाव जो तो घेऊ लागला याचेच आता आश्चर्य वाटू लागले होते. ' अनोखा दान 'चे बुजुर्ग दिग्दर्शक आसित सेन यानी, जाहिराला नवी मधुबालाच म्हटले. अर्थातच मधुबालाचा फुलोरलेला चेहरा आणि जाहिराचा सोफिस्टिकेटेड चेहरा यात काही साम्य नव्हते. आसित सेन याच्या ' अनोखा दान 'मध्ये तिच्या केसाच्या बटा उधळून पेश केलेले गाणे तिच्या चेहऱ्यापेक्षाही खुबसूरत होते. सलील चौधरीनी ' ओ सजना ' या ' परख 'मधल्या गाण्यानतर हे बरेच दिवसांनी चांगले गाणे (आवाज लताचा) दिले होते. ' आक्रात ' हा नवचित्रपटाच्या जातीचा अर्थशून्य चित्रपट एरवी नवचित्रपटाचे तत्र, छायाचित्रण तरी बरे असते, परतु या चित्राचे छायाचित्रणही इतके बकवास होते की, जाहिराची पॉलिश्ड खुबसुरतीही कॅमेऱ्याने टिपली नव्हती.

एका मागून एक चित्रे बाहेर पडत असतानाही जाहिराचे मार्केट कायम होते. ती अनेक नव्या चित्रपटामधून येत होती. एरवी पब्लिकमध्ये जाहिरा ही कुणाला पसत होती हे मला कळत नव्हते. दरम्यान जाहिरा शादी करणार अशीही एक अफवा होती. बहुतेक मार्केट नसल्याचाच परिणाम. दरम्यान तिची तीन चित्रे एका मागून एक आली. ' आलिंगन ', ' अजान राहें ' आणि ' कॉलगर्ल. ' रेहानाच्या पिक्चर्सच्या स्टाईलने जिकडे तिकडे लावलेली ' कॉलगर्ल 'ची पोस्टर्स पाहून पब्लिकला ते पिक्चर सेन्सेशनल वाटले असावे. एरवी त्या पिक्चरची स्टोरी कुठच्याही ' तवाएफ ' किंवा ' गिरी हुई औरत 'च्या पिक्चरच्या स्टोरीसारखीच होती. नाविन्य काहीच . नव्हते. एवढे मात्र खरे की ' आलिंगन 'मध्ये काय किंवा ' कॉलगर्ल 'मध्ये काय जाहिरा स्वीमिंग-पेहेरावात पेश व्हायला राजी होती. पण तसे काही हे प्रसग ' दो राहा ' स्टाईलप्रमाणे ' हॉट ' म्हणता येणार नाहीत. आजची कोणतीही नवी अभिनेत्री या पेहेरावात येण्यासाठी तयार आहे खर म्हणजे जाहिरा सेक्सी वाटतच नाही त्यामुळे ती कुठच्याही पेहेरावात आली तरी त्यामुळे कुणीही प्रेक्षक पेटणार नाही. तिच्या खुबसुरतीमध्ये एक पॉलिश्ड नजाकत आहे. त्यामुळे ती ' अनोखादान 'मध्ये त्याप्रमाणे पेश केली होती. तिचे केस भुरभुरताहेत, एका भावोत्कट मूडमध्ये मोहोरून स्वत ला हरवली आहे, तिच्या साडीचा पल्लू वाऱ्यावर उडतो आहे. असे तिचे स्वप्नील रूप पाहायला बरे वाटते

जाहिराची सगळ्यात मोठी उणीव म्हणजे तिचे डायलॉग. हिंदी डायलॉग तिला सफाईने पेश करता येतच नाहीत ती परदेशातून जी आली तो तिने हिंदी चित्रपटात पाऊल टाकले इग्रजी भाषेत ती इतकी सभाषण चतुर आहे की तिने इग्रजीतच बोलत राहावे असे वाटते पण हिंदी भाषेचा इस्तमाल करू लागली की ती आपल्याला कमालीची बोअर करते. तिला एक आवाज आहे, आपल्याकडे आवाज असलेल्या ज्या थोड्या अभिनेत्री आहेत, मीनाकुमारी, राखी, तसा तिचा आवाज वैशिष्ट्यपूर्ण नाही. परतु झीनत हिला एक आवाज आहे. झीनतच्या ज्या डायलॉगच्या लाडिक लकबी आहेत, त्यामुळे तो आवाज प्यारा वाटेल जाहिराच्या डायलॉगच्या काही लकबी आहेत. त्या लकबीमुळे, जाहिराच्या आवाजाविषयी आपल्याला तरी अॅलर्जी वाटली तो आवाज चागला कमावला तर कदाचित उद्या ती राखी किंवा मीनाकुमारीप्रमाणे त्यात जसवानी रग भरू शकेल.

' आलिंगन 'मध्ये ती जेव्हा नशा करू लागते आणि सुरेश चटवाल तिची कान उघडणी करू लागतो त्यावेळी तिने जरा चागल काम केल आहे. ' अजान राहें 'मध्ये ती स्कूल गर्ल म्हणून परफेक्ट वाटली. कोवळ्या वयाची, लहानशी, नाजूक कळीसारखी आणि अल्लड. त्याबरोबरच ती ' कॉल गर्ल ' म्हणून आली. कॉल गर्लमध्ये तिने ' लूक्स ' देण्याची स्टाईल अदाकारीचाच भाग म्हणून वापरला आहे, ती आपली भूमिका निभावण्यासाठी जाहिरा अतिशय मेहनत घेते यात शका नाही. परतु अद्याप ती आपल्या भूमिकेपासून दूरच रहाते. एरवीच ती पडद्यावर आपली इतकी सोफिस्टिकेटेड माशुका म्हणून दिसते की हिरॉईनच्या भूमिकेसाठी हवी असलेली तरळत ती अदा करू शकत नाही. ' आलिंगन 'च्या पार्टीत ती म्हणाली आहे, ' इक दूसो का जोडा 'मध्ये मला पहा. तोपर्यंत आपणही इतजार करूया ◻

## छत्तीस घंटे

### एक तरबेज उचलेगिरी

हम्फ्रे बोगार्ट आणि फ्रेडरिक मार्चचा ' दि डेस्परेट अवर्स ' आता कुणाला आठवतो ? ब्लॅक अँड व्हाईट जमान्यामध्ये ते पिक्चर येऊन गेले होते. आता लोकही विसरले असतील. पण आपण विसरलो नाही. या चित्रामधली काही छायाचित्रे पहाताच ओळखले की, ' छत्तीस घटे ' हे ' दि डेस्परेट अवर्स 'वरूनच घेतले असणार. एका सभ्य कुटुबात तीन डाकू घुसतात आणि त्या कुटुबातील प्रत्येक व्यक्तीला पिस्तुलाच्या नळीवर आपल्या तालाप्रमाणे नाचायला लावतात, ही या पिक्चरची आयडियाच चालणारी आहे. दिग्दर्शक राजतिलक याचे कौतुक एवढ्यासाठीच करायचे की, त्यानी ही आयडिया उचलली आणि वापरली. इर्मा ला दूस किंवा डर्टी हॅरीप्रमाणे अगदी आजच्या पिक्चरची त्यानी आयडिया उचलली नाही. आता हम्फ्रे बोगार्ट नि फ्रेडरिक मार्चही मरून गेलेत. कदाचित आपल्या स्टोरीची उचलेगिरी केल्याबद्दल राजतिलक याना कोर्टात खेचण्यासाठी कोणीही शिल्लक नसतील. त्यामुळे राजतिलक याचा कमावण्याचा मार्ग मोकळा झाला.

यात राजतिलक याची डाकूच्या कामासाठी सुनीलदत्त, रणजीत आणि डॅनी याची निवड अचूक होती. दुसरे म्हणजे त्यानी घेतलेला साखरपुड्याचा प्रसग, याखेरीज इतर साऱ्या गोष्टी म्हणजे उचलेगिरी आहे. ◻



अमिताभच्या हातात एखादा बाँब असल्याप्रमाणे हेमाने कान झाकून घेतले. धर्मेन्द्र मात्र ' होऊ दे कसलेही एक्स्प्लोजन ' अशा मूडमध्ये दिसतो. (रमेश सिप्पी दिग्दर्शित ' शोले ' )

## हिंदी चित्राचा प्रेक्षक

एक खेडवळ वयस्क बाई मुंबईला आली. तिच्या कौतुकासाठी तिच्या भावाने तिला एका हिंदी सिनेमाला नेले. झाले. सिनेमा सुरू झाला. हिरो-हिरॉइन यांचे प्यार सुरू झाले. काश्मीरमध्ये झाडाभोवती पकडापकडीचा खेळ करून गाणे गाऊ लागले. ते पहाता पहाता, ती गांवढळ बाई म्हणाली, ' हे काय चाललंय मला समजत नाही. दादा, चल घरी. ' दादा म्हणाला, ' अगं हाच तर आपला सिनेमा. ही पकडापकडी नि गाणी पहाण्यासाठीच तर हे प्रेक्षक आले आहेत. असे दोन-चार प्रसंग टाकले की एक सिनेमा तयार होतो आणि तो पहाण्यासाठी प्रेक्षक येतात. हे प्रसंग जर दाखवले नाहीत तर या थिएटरमध्ये कोण येऊन बसणार आहे ? □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे **येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**